
एप्रिल २०२६
तो पुनरुत्थित झाला आहे!


Happy Easter To All
From
DREAM SERVICES
We offer following Services:
1. GST registration and return filing
2. Income tax return filing
3. Account writing
4. Investment Advisory
Address:
Dream Bunglow, Manickpur, Behind Y.M.C.A. Hall,
Vasai - 401202. Mobile: 9823123644


RD Associates
Cost Consultant, PMC, Contractors
CONTACT:
7045963449
RAYMOND D'SOUZA A NOTED CIVIL CONTRACTOR.
EMAIL:RAYMONDCD7@GMAIL.COM.
• QUALITY ASSURANCE...IS OUR IDENTITY✨
ADDRESS
710, C Wing, Dosti Coral 3, Near St. Alphonso Church, Barampur, Vasai Road (W)

# माणिक


**माणिक** : ०५ एप्रिल २०२६

**प्रकाशक** : फा. असिस रॉड्रीग्ज, ये.सं.
प्रमुख धर्मगुरू
संत मायकल चर्च, माणिकपूर

**संपादन सहाय्य मंडळ :**
जेनेट वॉल्टर सिरेजो, मीना आन्सेल परेरा, कॅथरीन मायकल डिमेलो, सुनिता ब्लेस मिरांडा, रेश्मा रेमंड डिसोजा, अनिता विनय डिमेलो, संगिता बेनो सिरेजो, जेनीफर डिसोजा, इजाबेल स्टॅनी लोपीस, अर्चना फ्रेडी आल्मेडा, अर्चना पिटर आल्फान्सो

**मुद्रक** : मॅन्युअल प्रिंट, वसई (पूर्व)
मो. ९७६५८७४४९३

**खाजगी वितरण**





| | | |
|---|---|---|
| १. | दुःखातून पुनरुत्थानाकडे | अतिथी संपादकीय |
| २. | जागतिक शांततेसाठी तीर्थयात्रा | फा. असिस रॉड्रीग्ज |
| ३. | क्षमा | जेनेट सिरजो |
| ४. | क्रुसाखाली पडणं | सुनीता मिरांडा |
| ५. | वेरोनिका : आमचे प्रेरणास्थान | कॅथरीन डिमेलो |
| ६. | भूमिका | मीना परेरा |
| ७. | मी जगून केले कार्य काय ? | अनिता डिमेलो |
| ८. | चिंतन | रेश्मा डिसोजा |
| ९. | परीक्षा | जॉन लोपीस |
| १०. | वेदनेतून पुनरुत्थानाकडे | नीना डिमेलो |
| ११. | क्रुस ते क्रांती... | ज्युली आल्मेडा |
| १२. | स्त्री शक्तीला मानाचा मुजरा | प्रियांका कोलासो |
| १३. | आंतरिक परिवर्तनाचा काळ | स्वीटी कोलासो |
| १४. | दुःखावर विजयाची कहाणी | सांतान डिमेलो |
| १५. | वेदनेतून मिळालेली प्रेरणा | क्लेरा आल्मेडा |
| १६. | वेदनेतून विजयाकडे | लिडिया लोपीस |
| १७. | पुनरुस्थानाची मंगल पहाट | क्रिस्टी सिरेजो |
| १८. | दुःखसहन एक कौटुंबिक प्रवास | मेरी डिमेलो |
| १९. | Anger | Gregory Monis |
| १९. | Walk with God | Dr. Marisca Pereira |
| २०. | Search | सिल्विया कोलासो |
| २१. | Every breath is a hidden treasure | - सिल्विया कोलासो |
| २२. | Sports to Spirituality | Pascol Roque Lopes |





**"तो उठला आहे!" हीच आपल्या विश्वासाची विजयगाथा आहे.**
**तुम्हाला व तुमच्या कुटुंबाला पास्काच्या सणाच्या हार्दिक शुभेच्छा!**

***"He is risen!" — the true victory of our faith.***
***Wishing you and your family a very Happy Easter!***

**- सर्व धर्मगुरु, सिस्टर्स आणि माणिक परिवार**

✰ या अंकात व्यक्त झालेले विचार त्या त्या लेखकांचे, कवीचे आहेत. संपादक मंडळ त्या मतांशी सहमत असतीलच असे नाही.



ह्या अंकासाठी ज्या ज्या लेखकांनी, कवींनी, चित्रकारांनी, शुभेच्छा देणाऱ्यांनी सहकार्य केले, त्याबद्दल प्रकाशक आणि संपादन मंडळ त्यांचे ऋणी आहे.

अतिथि संपादकीय

# "दुःखसहनातून पुनरुत्थानाकडे"

- स्टीफन मिंगेल घोसाळ ये.स.

पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातील माणिकपूर येथील संत मायकलच्या धर्मग्रामाचा ४१९ वर्षांचा समृद्ध आणि आध्यात्मिक वारसा आहे. या धर्मग्रामाने अनेक ऐतिहासिक चढ-उतार अनुभवले, तरीही विश्वासाचा दिवा आजही तेजाने प्रज्वलित आहे. सुरुवातीला हे धर्मग्राम जेज्वीट धर्मगुरूंच्या ताब्यात होते; नंतर Society of Jesus म्हणजेच, येशू संघाला दडपले गेल्यामुळे, हे धर्मग्राम, मुंबई सरधर्मप्रांताच्या ताब्यात गेले. परंतु १९४९ साली पुन्हा हे धर्मग्राम जेज्वीटांच्या ताब्यात परत आले. हा इतिहासच आपल्याला एक आध्यात्मिक संदेश देतो, दुःख सहनातून पुनरुत्थानाकडे जाण्याचा प्रवास, जरी तो खडतर असला तरी त्या क्षणी तो निभावून नेला पाहिजे, ह्या कठीण परिस्थितीमध्ये जो टिकला, तो टिकला.



ख्रिस्ती जीवन म्हणजे क्रूसापासून पुनरुत्थानाकडे जाणारी वाटचाल. इग्नेशियस लोयोलाकर यांच्या `इग्नेशियन` आध्यात्मिकतेत आपल्याला पुनरुत्थानाचे रहस्य अनुभवण्याचे आमंत्रण दिले आहे. येशूच्या दुःखभोगात त्याच्याबरोबर चालणे आणि त्याच्या पुनरुत्थानाच्या आनंदात सहभागी होणे. जीवनातील वेदना, अपयश आणि संघर्ष हे सर्व काही शेवट नसून, ते देवाच्या कृपेने नव्या जीवनाची सुरुवात ठरू शकतात.

`शुक्रवाराचा काळोख` अखेरीस इस्टरच्या प्रभातकाळात रूपांतरित होतो. आपल्या आयुष्यातही निराशा, एकटेपणा आणि संकटाचे क्षण येतात. पण देवाच्या कृपेवर विश्वास ठेवला, तर हे अंधाराचे क्षण आशा आणि आनंदात बदलू शकतात. देव कधीही आपल्या लोकांना सोडत नाही; तो दुःखातून नव्या आशेचा मार्ग दाखवतो.

इग्नेशियन परंपरेत आपण पुनरुत्थित प्रभूच्या आनंदात सहभागी होण्यासाठी कृपेची प्रार्थना करतो. हा आनंद केवळ क्षणिक नसून अंतःकरणात खोलवर टिकणारा असतो. जेव्हा आपण पुनरुत्थित ख्रिस्ताला अनुभवतो, तेव्हा आपल्या जीवनात नव्या विश्वासाची आणि नव्या धैर्याची ज्योत पेटते.

पुनरुत्थानाचा अनुभव नेहमीच आपल्याला मिशनकडे घेऊन जातो. पुनरुत्थित ख्रिस्ताचे साक्षीदार म्हणून आपण प्रेम, सेवा आणि दयाळूपणाने समाजात जगण्यास बोलावलेले आहोत. आपल्या माणिकपूर धर्मग्रामाचा दीर्घ इतिहासही याच मिशनची साक्ष देतो. ख्रिस्ताचे प्रेम जगात पोहोचवण्याची. म्हणूनच, या उपवास काळात आणि पुनरुत्थान काळात आपण सर्वांनी हा आध्यात्मिक प्रवास नव्याने स्वीकारू या. क्रूसापासून पुनरुत्थानाकडे, दुःखातून आशेकडे, आणि अनुभवातून सेवेकडे.

◆

# जागतिक शांततेसाठी तीर्थयात्रा

- फा. असिस रॉड्रिग्ज, ये.सं.
प्रमुख धर्मगुरू

संत मायकल चर्चच्या वतीने युद्धांचे सावट दूर व्हावे आणि जगात शांतता पसरावी या उद्देशाने विशेष तीर्थयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. उपवास काळाचे औचित्य साधून काढण्यात आलेल्या या पदयात्रेत अनेक भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत शांतीचा संदेश दिला. सध्या सुरु असणाऱ्या युद्धामुळे जगभरात अस्थिरता आणि अशांतता पसरली आहे. लोकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे जागतिक शांततेचा संदेश देण्यासाठी ह्या 'पिलग्रिम वॉक' म्हणजेच तीर्थयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. मुंबईत गेली ३५ वर्षे सुरू असलेल्या या उपक्रमाचा प्रयोग यंदा पहिल्यांदाच आपल्या येथे करण्यात आला.ही तीर्थयात्रा शनिवारी रात्री १० वाजता संत मायकल चर्च, माणिकपूर येथून प्रार्थनेने सुरू झाली. त्यानंतर बऱ्हामपूर, पापडी, रमेदी, मर्सिस, सांडोर, चुळणे अशा विविध चर्चच्या परिसरातून मार्गक्रमण करत या तीर्थयात्रेची सांगता पहाटे ५ वाजता संत मायकल चर्च, माणिकपूर येथे झाली. या तीर्थयात्रेत विविध वयोगटातील भाविक सहभागी झाले होते. तब्बल सात तास चाललेल्या या तीर्थ यात्रेत भाविकांनी प्रार्थना, चिंतन आणि एकोप्याचा अनुभव घेतला. तसेच पदयात्रेत शारीरिक थकवा जाणवत असूनही भाविकांच्या चेहऱ्यावर श्रद्धा आणि उत्साहाची ओढ दिसून येत होती, असे आयोजकांनी सांगितले. एक वेगळीच आध्यात्मिक शक्ती यात्रेकरूंना मिळत होती. ख्रिस्ताच्या वचनाची आठवण वारंवार होत होती. **''देह अशक्त आहे परंतु आत्मा उत्सुक आहे.''** ही तीर्थयात्रा 'झावळ्यांचा रविवार' (पाम संडे) निमित्त आयोजित केली होती. हा दिवस येशूच्या यरुशलेममधील प्रवेशाची आठवण करून देतो. येशूने गाढवावर बसून प्रवेश करणे हे ते 'शांतीचा राजा' असल्याचे प्रतीक आहे. आजच्या अस्थिर आणि अशांत जगात याच शांतीचा संदेश देण्यासाठी या तीर्थयात्रेचे आयोजन करण्यात आले होते."पहाटे पदयात्रा पुन्हा माणिकपूर येथे परतल्यानंतर पवित्र मिस्सा साजरी करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. ◆











# क्षमा

- सौ. जेनेट सिरेजो



लहानपणापासून फा. बेनेदेत्तीचं गाणं... मम प्रभुराया दयासागरा । क्षमा क्षमा मजवर हे ईश्वरा । त्यातून परमेश्वर दयाळू, कृपाळू व कनवाळू आहे. तो क्षमेचा, करुणेचा व दयेचा महासागर आहे हे मनावर खोलवर बिंबवलं गेलं. उपवासकाळात हे गाणे गातांना केवळ आपल्या पापांमुळे तो क्रुसावर खिळला गेला. आपल्या मुक्तीसाठी त्याला क्रुसावरचे यातनामय बलिदान द्यावे लागले हा विचार आजही मन सुन्न करून जातो, हृदय विदीर्ण करतो. पश्चाताप व परिवर्तनाची तीव्र जाणीव करून देतो. ख्रिस्ताचं अपरिमित दुःख, त्याचे असह्य क्लेश, आंतरिक वेदना, रक्तबंबाळ शरीर, त्याच्या ठसठसणाऱ्या जखमा, कण्हणं -विव्हळणं, आर्त किंकाळ्या.... सारं कांही शब्दांच्या पलिकडे घेऊन जाते व आपल्यातील पापप्रवृत्ती, दुष्टता, गर्व, अहंकार, स्वार्थ ह्याची प्रखर जाणीव होऊन हृदय दुःखावेगाने फाटून जाते. त्याने आचरलेली प्रेम, सेवा, करुणा, त्याग व क्षमा ह्या शाश्वत व चिरंतन मूल्यांची खोलवर जाणीव होऊन हृदय पश्चातापाने व लज्जेने व्याकूळ होते. डोळ्यातून नकळत टिपं गळतात. क्रुसावरून अखिल मानवजातीसाठी त्याने दिलेला क्षमेचा व नम्रतेचा आदर्श ज्याची इतिहासाने देखील नोंद केलेली आहे.... त्याची वारंवार प्रचिती येते.

क्षमा हा हृदयाचा धर्म आहे. पापांचे पुण्यामध्ये परावर्तन करण्याची शक्ती फक्त क्षमेमध्ये आहे. अन्य कोणत्याही वस्तूमध्ये नाही. पायदळी चुरगळली जाणारी फुले, चुरगळलेल्या पायांना आपला सुगंध अर्पण करतात. खऱ्या क्षमेचे हेच कार्य आहे.

Forgiveness is a sacrifice of the ego on the Altar of Love, To err is human but to forgive is divine. God pardons like a mother who kisses the offence into everlasting forgetfulness.

ख्रिस्ताची क्षमा दैवी व महान होती. खळाळत्या झऱ्याप्रमाणे ती त्याच्या हृदयातून ओसंडून वहात होती. ती निर्मळ, शुद्ध व पवित्र होती. तिच्यातून केवळ नैतिकतेचा, प्रीतीचा व सदाचारांचा सुगंध दरवळत होता. ती विकार-वासनांनी, सूड-अहंकाराने पेटलेली नव्हती तर केवळ चांगुलपणाने ओतप्रोत भरलेली होती. तिला मोजमाप नव्हते, ती अमाप होती. शब्दांच्या पलीकडची होती.

* असहाय्य वेदनेत व दुःखात क्रुसावर लटकलेला असतांना त्याने आपल्या शत्रूना क्षमादान देताना म्हटले '' पित्या त्यांना क्षमा कर कारण ते काय करतात ते त्यांना ठाऊक नाही. ह्या एका वाक्याने मानवी इतिहासाला कलाटणी दिली आहे. कविश्रेष्ठ कुसुमाग्रज म्हणतात 'हेच ते वाक्य जे चिरंतन काळासाठी आभाळाच्या भिंतीवर कोरलं गेलं आहे.''

* व्यभिचार करतांना पकडलेल्या अभागिनीवर दगडमार करण्यासाठी उतावीळ झालेल्या जमावाला

ख्रिस्ताने सांगितले '' ज्यांने आजपर्यंत एकही पाप केले नाही त्यांनी पहिला दगड मारावा'' हे वाक्य देखील मानवतेच्या कानी सतत घुमत आहे.

* उधळया पुत्राची कथा.... चैनबाजी व विलासीवृत्तीमुळे घर सोडून गेलेला तरूण मुलगा... मजा-मस्ती संपल्यावर आलेले रितेपण, एकटेपणा, अपराधीभावना, त्याचे स्वगृही परतणे, पुत्रत्वाच्या वियोगाने विव्हळणारे पितृहृदय, पुत्राचे अनपेक्षित आगमन. पित्याने अत्यानंदाने केलेले त्याचे भरभरून स्वागत. ह्यातून क्षमेचाच सुंदर आदर्श मानवापुढे ठेवला आहे.

* क्रुसावर खिळलेल्या दोन चोरांपैकी उजवीकडील एका अट्टल गुन्हेगार चोराने येशूकडे दयेची याचना केली असता, येशूने त्याला म्हटले, ''मी तुला खरोखर सांगतो, आज तूं माझ्याबरोबर सुखलोकात असशील !'' काय म्हणावं ह्या करुणेला व क्षमेला.

* येशूसाठी आपला प्राण द्यावयास तयार असलेला प्रिय शिष्य 'पेत्र' ह्याने येशूला तीनदा नाकारले तरीही पुनरुत्थानानंतर येशूने त्याला त्याचा प्रमादाची मुळीच आठवण करून न देता त्याच्याकडून त्रिवार निष्ठेचे वचन घेऊन त्याला उत्तराधिकारी नेमले. खरोखर येशूची क्षमा शब्दातीत व कल्पनातीत होती.

* चांदीच्या ३० नाण्यांच्या हव्यासापोटी ज्युदास येशूचा विश्वासघात करतो कारण तो द्रव्यलोभी व सैतानी प्रवृत्तीचा होता. येशूला धरून देतांना बाहेर काळोख होता तसाच ज्युदासच्या मनातही काळोख होता. येशूला ह्याचा प्रचंड त्रास होतो, त्याच्या तोंडून दुःखोद्गार निघतात परंतु येशूने त्याच्या कृतीचा निषेध केला नाही, त्याला कोणती शिक्षाही केली नाही उलट सांगितले ''तुला जे करायचे, ते लवकर कर.''

* अविश्वासी थोमा - पुनरुत्थानानंतर बंद खोलीत येशू शिष्यांना दर्शन देतो. त्यावेळी तिथे हजर नसलेला थोमा संशय व्यक्त करतो. येशू थोमा हजर असताना पुन्हा दर्शन देऊन थोमाला म्हणतो ''आपले बोट इकडे कर व माझा हात पहा, तुझा हात माझ्या कुशीत घाल, संशय सोड, विश्वास धर. विश्वासहीन असू नकोस... तर विश्वास ठेवणारा हो.''

* पेत्राने येशूला विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देतांना येशू म्हणतो तुझ्या भावाच्या अपराधांबद्दल केवळ सात वेळा नव्हे तर साताच्या सत्तर वेळा क्षमा कर.

* क्षमेविषयी आणखीन प्रभू म्हणतो, तू आपले दान अर्पण करण्यास वेदीजवळ आणीत असताना आपल्या भावाच्या मनात तुझ्या विरुद्ध वैर आहे ह्याचे स्मरण झाल्यास ते दान तिथेच ठेव. प्रथम जाऊन आपल्या भावाबरोबर समेट कर व मग येऊन तुझे दान अर्पण कर.

* पवित्र गुरुवारी शिष्यांचे पाय धुवून प्रेम, सेवा व नम्रतेचा आदर्श त्याने जगासमोर ठेवला. 'जशी मी केली प्रीती तुम्हांवर तशी प्रीती बरसात करा'' हा सुंदर संदेश दिला.

बायबलमधील वरील उदाहरणांवरून आपल्या लक्षात येते की देवाच्या करुणेला अंत नसतो. अखेरच्या क्षणापर्यंत तो आपल्याला पश्चातापाची संधी देऊन क्षमा करतो.आपला भूतकाळ किती काळाकुट्ट आहे हे तो कधीच पहात नाही. तर उज्वल भविष्यकाळाची तो सतत जाणीव करून देतो.

क्षमेची सुंदर उदाहरणे आपल्याला संत-महंतामध्ये देखील पहावयास मिळतात. **संत पोप जॉन पॉल दुसरे** आपल्यावर गोळ्या झाडणाऱ्यांला तुरूंगात जाऊन

भेटतात व मोठ्या मनाने क्षमा करतात. **संत मदर तेरेजा** कलकत्त्यातील गल्ली बोळात आपल्या अनाथ लेकरांसाठी अन्नाची भीक मागताना दुकानदार तिला शिवीगाळ करतात, तिच्यावर अक्षरशः थुंकतात, असभ्य वर्तन करतात परंतु ही करूणेची माऊली त्यांना हसत हसत सांगते हे सर्व माझ्यासाठी दिलं आता माझ्या उपाशी लेकरांसाठी काहीतरी द्या तेव्हा लाजेने चूर होऊन प्रत्येक दुकानदार तिच्या पोत्यात धान्य व इतर वस्तू टाकतात.ज्यांनी कितीतरी पोती भराभर भरतात. **दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष नेल्सन मंडेला** २७ वर्षाचा प्रदीर्घ कारावास भोगून सुटून आल्यानंतर एका हॉटेलात आपल्या मित्रांसोबत जेवणासाठी जातात तिथे ज्या तुरुंग अधिकाऱ्यांने त्यांना अत्यंत लज्जास्पद व घृणास्पद वागणूक देऊन त्यांचा प्रचंड छळ केलेला असतो तो एका टेबलवर बसलेला असतो. मंडेलांना पाहून तो शरमिंदा होतो. परंतु ही महान व्यक्ती त्याला आपल्या टेबलवर सन्मानाने बोलावून आपल्या मित्रपरिवारांबरोबर त्याला पोटभर जेवू खाऊ घालतात व आदराची वागणूक देतात. क्षमेची किमया काय वर्णावी? "Revenge kills, forgiveness heals'' **सूडभावनेमुळे आपण हिटलरच्या वर्गात मोडतो तर क्षमादानामुळे आपण ख्रिस्ताचे खरे शिष्य बनतो.**

आज आपण समाजात अवती-भवती काय पहातो...? जमीन-जुमला, मालमत्ता, घराचे हिस्से, वाटण्या ह्यामुळे कुटुंबा-कुटुंबातील, भावाबहीणीतील प्रेमाचे व जिव्हाळ्याचे नातेसंबंध तुटत चालले आहेत. तंत्रज्ञानामुळे जग जवळ आलेले आहे पण नात्यातले अंतर वाढत आहे. नाती तुटत चालली आहेत. कोर्टकचेऱ्या, कित्येक वर्ष अबोला, लग्न वा मरण असो परंतु एकमेकांची तोंडे बघत नाही. शाब्दीक चकमक तर नेहमीच असते. परंतु त्यापलिकडे मारामारी पर्यन्त मजल जाते. सुसंवाद, समंजसपणा, माघार, नमतेपणा व समेट बिलकूल नाही उलट स्वार्थ, गर्व, मिजास, अहंकार, श्रेष्ठत्व, सूड इत्यादी दुष्ट, कलुषित व नकरात्मक भावनांचे पीक अधिक आहे. समाज बघ्याची भूमिका घेतोच पण कधी कधी नकळत ह्या दुष्ट प्रवृत्तींना खतपाणी तर घालत नसतो..?

२००० वर्षांपूर्वी क्रुसावरून वेदनेने तळमळणाऱ्या ख्रिस्ताचा क्षमेचा संदेश अजूनही आपल्या काळजाला भिडला नाही? बायबलमधील येशूचे क्षमेचे दाखले व वचने घरातील बंद बायबलमध्ये तसेच पडून आहेत? ख्रिस्ताची सुंदर मूल्ये, त्याची शिकवण व आदर्श ह्यांचे पूर्ण विस्मरण आपल्याला व्हावे? यहुदी शिपायांची अमानुष क्रूरता आपल्या डोळयात भरते परंतु आपल्यातील हिंसात्मक प्रवृत्तींचा कधी विचार करतो का आपण?

चला तर उपवासकाळ हा क्षमेचा, समेटाचा एकमेकांना समजून घेण्याचा व परिवर्तनाचा काळ आहे. स्व. पोप फ्रान्सिस नेहमीच सांगायचे की शारीरिक उपवास करून दिखाऊपणा करू नका... तर स्वच्छ, सुंदर, निर्मळ मनासाठी उपवास करा. सात्विकता, शुद्धता व पावित्र्याचे सौंदर्य हृदयात भरा ज्यामुळे मनात साचलेली घाण निघून जाईल व सत्य-सुंदर-मंगलाचीच नित्य आराधना होत राहील. ख्रिस्ताची क्षमेची शिकवण अंगीकारून कुटुंबात, समाजात व घरोघरी प्रेम, शांती व समेटाचे साम्राज्य पसरविण्यासाठी कटिबद्ध होऊ या... ज्यामुळे जिवाभावाच्या प्रेमळ नात्यांचा सुंगध सर्वत्र दरवळत राहील व जगणं अधिक सुंदर बनेल. ◆◆

# क्रुसाखाली पडणं

सुनिता ब्लेस मिरांडा

उपवासकाळात आपण क्रुसाच्या वाटेच्या भक्तीत सहभागी होऊन प्रभू येशू खिस्ताच्या दुःखसहनाशी एकरूप होण्याचा प्रयत्न केला. या क्रुसाच्या वाटेवरील प्रत्येक स्थान म्हणजे एक घटना आहे. त्यातील एक घटना अशी आहे की जी एकदा नाही, दोनदा नाही तर तीनदा घडते. ती घटना म्हणजे येशू ख्रिस्ताचं क्रुसाखाली पडणं. आश्चर्य आहे नाही ? येशू ख्रिस्त... देवाचा पुत्र... एकदा नाही, दोनदा नाही, तीन वेळा पडला. का बरं ? कोणी म्हणेल क्रूस जड होता, कुणी म्हणेल शिपायांनी त्याला ढकललं असेल, कोणी म्हणेल फटक्यांच्या माराने तो थकला असेल. या सगळया कारणांमुळे जसं त्याचं शरीर थकलं होतं, पडलं होतं तसंच त्याचं मन ही



तीन वेळा पडत होतं. शरीराचं पडणं दिसतं पण मनाचं पडणं दिसत नाही.... शरीरावर होत असलेला प्रत्येक वार त्याच्या मनावरही होत होता. देवाचा पुत्र असूनही त्याने मानवी देह धारण केला होता आणि या मानवी देहाच्या, माणूसपणाच्या प्रत्येक वेदना तो अनुभवत होता. त्याच्याच एका शिष्याने त्याचा विश्वासघात केला होता, एकाने तर त्याला चक्क तीन वेळा नाकारलं, ज्या लोकांना त्यानं बरं केलं होतं तेच लोक आज त्याच्यावर दोषारोप करत होते. मित्रांनी आणि लोकांनी केलेल्या अपमानानं, मानहानीमुळे, टिकेमूळे तो तीनवेळा पडला. पण तरी देखील तो निराश झाला नाही. तो तीनदा पडला पण प्रत्येक वेळी तो प्रयत्न करून उठला. कारण क्रुसाचा स्वीकार करण्याअगोदर त्यानं गेथसेमनी बागेत देव पित्याजवळ प्रार्थना केली होती.... ''शक्य असेल तर हा प्याला माझ्यापासून दूर कर पण माझ्या इच्छेप्रमाणे नाही तर तुझ्या इच्छेप्रमाणे.''

Where there is prayer, there is power to stand again.

पडणं मानवी आहे. माणूस चुकतो, पडतो पण देवाच्या कृपेने पुन्हा उभे राहणे हीच खरी श्रद्धा आहे.आपण अनेक वेळा पडतो. केवळ शरीरानचं नाही तर मनाने सुद्धा. आपण मोहात पडतो, व्यसनात पडतो, अहंकारात पडतो, निराशेत पडतो, अपयशात पडतो, रागात पडतो, द्वेषात पडतो, कधी कधी इतरांच्या चुकांमुळे सुद्धा आपण पडतो. लोकांनी केलेली टीका, मित्रांनी केलेला विश्वासघात, सोशल मीडियावर झालेली बदनामी, ब्रोकन रिलेशनशिप्स. अशा कितीतरी कारणाने आपण भावनिक आणि मानसिकदृष्ट्या कोलमडतो. पण देवावर विश्वास असेल, त्याच्या योजनांवर विश्वास असेल तर जीवनात अनेक वेळा पडून देखील आपण पुन्हा पुन्हा उठू शकतो हेच ख्रिस्ताने दाखवून दिलेलं आहे.

Every fall is a reminder that we need divine strength.

देवाने आपल्यावर इतकं प्रेम केलं की त्याने आपल्याला चुका करण्याचं ही स्वातंत्र्य दिलं आणि चुकल्यानंतर पश्चाताप व क्षमेद्वारे परतीचा मार्गही

दाखवला.येशूच्या दोन शिष्यांचच उदाहरण घ्या. ज्यूदास आणि पेत्र. ज्यूदासने पैशाच्या मोहापायी त्याचा विश्वासघात केला आणि पेत्राने भीती पोटी त्याला ओळखण्यास तीन वेळा नाकारलं.मात्र दोघांनाही जेव्हा आपल्या चुकीची जाणीव झाली, तेव्हा त्यांना प्रचंड पश्चाताप झाला. पण पश्चातापानंतर पेत्र येशू ख्रिस्ताकडे परत आला.... त्याने क्षमा मागितली. नम्र आणि पश्चातापी अंतःकरण मी झिडकारणार नाही ह्या वचनाने येशूने मोठ्या मनानं त्याला क्षमा केली आणि पेत्राचा संत पीटर बनला, ख्रिस्त सभेचा पहिला पोप. पण पश्चातापाने निराश झालेला जुदास मात्र खिस्ताकडे आला नाही, त्यानं क्षमा मागितली नाही आणि स्वतःचा शेवट त्याने आत्महत्येने केला.आपल्या दैनंदिन आयुष्यात, आपण कितीतरी वेळा पडतो,

We fall, we break, we fail

But then if we repent, if we forgive

We rise, we heal, we overcome.

पण त्यासाठी देवाबरोबर आपण सतत ऑनलाईन असणं गरजेचं आहे.देवाबरोबर ऑनलाइन कसं राहायचं ?

**※ रोजची प्रार्थना:**

घरातून निघताना, प्रवास करताना, घरी परत आल्यावर देवाचे नामस्मरण करणे गरजेचे आहे. त्यासाठी खूप मोठमोठ्या प्रार्थना पाठ करायची गरज नाही. रोज शक्य नसेल तरी निदान रविवारच्या मिस्सेला नियमितपणे हजर राहणे. केवळ शरीराने नाही तर अगदी मनापासून. पवित्र मिस्सेचे महत्त्व आपल्याला संत कार्लो आकुतीस सांगतो.... "पवित्र मिस्साबलीदान म्हणजे माझा स्वर्गाकडे नेणारा राजमार्ग आहे." "The Eucharist is my highway to Heaven."प्रार्थना केल्याने संकटं येणारच नाहीत असं नाही पण प्रार्थनेमुळे संकटांशी लढण्याचं बळ नक्कीच मिळते. रविंद्रनाथ टागोर म्हणतात : मला संकटातून वाचव अशी माझी प्रार्थना नाही. तर संकटात न घाबरण्याची शक्ती मला दे.

**※ देवाबरोबर संवाद :**

अडीअडचणीच्या प्रसंगी देवाबरोबर संवाद साधा. त्याची मदत मागा. कोणत्या ना कोणत्या रूपाने देव तुमच्या मदतीस येईल हा विश्वास बाळगा. आपल्या संरक्षणासाठी, मार्गदर्शनासाठी देव वेळोवेळी आपल्यासाठी रक्षक दूत guardian angels पाठवीत असतो. हे 'Guardian angels' आपल्याला ओळखता आले पाहिजेत. आपले फादर्स, सिस्टर्स, आजी-आजोबा, आई-वडील, भाऊ-बहीण, मित्रमंडळी, आपले नातेवाईक हे खरे आपले guardian angels आहेत. अडीअडचणीच्या प्रसंगी त्यांची मदत घ्या. इतरांसाठी रक्षक दूत बनण्याचा प्रयत्न करा.

**※ सद्सदविवेक बुध्दी जागृत ठेवा :**

वाचन, आत्मपरिक्षण, ध्यान इ. द्वारे आपला आंतरिक आवाज जागृत ठेवा.आयुष्य खूप सुंदर आहे आणि आपल्याला मिळालेला जन्म ही देवाची सर्वोच्च देणगी आहे. ती वाया जाऊ देऊ नका. म्हणूनच, जेव्हा आपण पडतो शरीराने किंवा मनाने तेव्हा निराश न होता, चुकीच्या मार्गाने न जाता देवावर विश्वास ठेवूया. पश्चात्ताप करूया, एकमेकांना क्षमा करूया आणि नव्या आशेने पुन्हा उभे राहूया..... ख्रिस्ताद्वारे... ख्रिस्तासह... आणि ख्रिस्ताठायी !!!

◆

# वेरोनिका : आमचे प्रेरणास्थान

कॅथरीन मायकल डिमेलो

वेरोनिका हे नाव लॅटिन आणि ग्रीक मूळचे असून याचा अर्थ ''खरी प्रतिमा'' असा होतो. ''नसे शोभा प्रभूच्या तोंडी सुंदर आकृती न दिसे आम्हा'' हे वेरोनिकेचे विलापगीत ऐकले की हृदय पिळवटून निघते. तिने सहाव्या स्थानामध्ये येशूच्या आत्यंतिक दुःख व करुणेची खरीखूरी प्रतिमा साकारुन त्याद्वारे यथोचित गौरव केला.



सहाव्या स्थानात कालवारीचा रस्ता चालताना येरुशलेमच्या स्त्रियांच्या घोळक्यात वेरोनिका नावाच्या स्त्रीने ख्रिस्ताचा धुळीने, घामाने, शिपायांच्या थुंकीने, रक्ताळलेला विद्रूप झालेला चेहरा पुसला. शिपायांना व गर्दीला न जुमानता, प्रचंड जनसमूदायाला बाजूला सारुन आपल्या रुमालाने ख्रिस्ताचा मलीन झालेला चेहरा ती पुसते. तिला बक्षीस म्हणून येशू आपल्या चेहऱ्याचे रुप त्या रुमालावर उमटवतो. वेरोनिकेने रुमाल धैर्याने पुढे केला, त्यावेळच्या पुरुषप्रधान समाजात केलेले काय हे धाडस !

हे येशू, आजही आम्हाला क्षणोक्षणी वेरोनिका दिसतात. हया वेरोनिका असतात कुष्ठरोग्यांच्या आश्रमात त्यांच्या जखमा स्वच्छ करणाऱ्या सिस्टरांच्या रुपात, वृध्दाश्रमात आयुष्याच्या संध्यासमयी निराश व आशेने आपल्या आप्तांची वाट पाहणाऱ्या, वृध्द दांपत्यांना प्रेमाचा ओलावा देणाऱ्या सिस्टर, कुष्ठरोग्यांची सेवा करणारी ग्लॅडस स्टेन्स, कलकत्याच्या आश्रमात अनाथ, बेवारस बालके, विधवांचा सांभाळ करणारी मदर तेरेजा, पोरक्या मुलांचा सांभाळ करणारी, अनाथांची माय, स्वतःच्या खडतर आयुष्यात संघर्ष करीत हजाराहून अधिक मुलांचे पालन पोषण करणारी सिंधुताई, जगाच्या कानाकोपऱ्यात कितीतरी धर्मभगिनी सेवाकार्य करीत आहेत. आपल्या समाजातही आपल्या नावाचा गाजावाजा न करता, कोणाला रुग्णालयात नेणे, रक्ताची व्यवस्था करणे, त्यांच्या समवेत रुग्णालयात त्यांना सोबत करणे अशा प्रकारची सेवा काही स्त्रिया करीत आहेत.

वेरोनिकाने ख्रिस्ताचा चेहरा पुसला. आपल्या जीवनात घायाळ ख्रिस्त वेगवेगळ्या रुपात येत असतो. गर्दीमध्ये अनेक लोक होते पण रुमाल काढणारी ती एकटीच! ते एवढे सोपे नव्हते. ती धैर्यशील होती, कृतीशील होती. तिच्यातली वेदना व कळवळा जागृत झाला. आज जगाला करुणेची गरज आहे. साऱ्या विश्वाचा चेहरा घायाळ झालेला आहे. करुणेसाठी तो आक्रोश करीत आहे. ख्रिस्त म्हणतो, मला कुणी रुमाल देता का? चला तर, आपणही प्रत्येकजणी वेरोनिका प्रमाणे रुमाल बाहेर काढू या. आशेचे वर्ष संपले पण आशा संपली नाही. अशा या वर्षात तुटल्या फुटल्या चेहऱ्याला एक नवी आशा देऊ या.

ख्रिस्ताकडेही एक रुमाल होता. त्याने विश्वाचा चेहरा पुसला. त्याने कुष्ठरोगी पापी, अंध, मुके, बहिरे, रंजले गांजले , तळागाळातील, विधवा, निराश झालेले, शेतकरी, टाकून दिलेले बाळ , अनाथ बालके, प्रेमाला हपापलेली बालके, अत्याचारी व बलात्कारी महिला, ज्यांना माणूस म्हणून जीवन जगता येत नाही, अनेक लोकांना आजही आपले मानवी हक्क मिळत नाहीत, कुपोषितग्रस्त बालके, कॅन्सरग्रस्त रुग्ण,

व्यसनी, तुरुंगातील कैदी, युध्द, दुष्काळ, पुराने, भूकंपाने बेघर झालेले एक ना हजारो चेहरे विद्रूप झालेले आहेत. हे ख्रिस्ताचे चेहरे आहेत. वेरोनिकेचा करुणेचा रुमाल दुःख, यातना, व्यथा ऐकत आहे चला तर, मग आपण गर्दीतून, काट्याकुट्यातून, अडचणींतून मार्ग काढत पुढे जाऊ या. म्हणजे आपल्याही काळजावर वेदनेने तडफडणाऱ्या ख्रिस्ताचे चित्र उमटेल. ''पुष्कळ अजुनी उणा प्रभू मी.'' रे. टिळक. प्रभू मला वेरोनिका सारखे खूप खूप चेहरे पुसायचे आहेत. माझे कार्य पूर्ण झाले नाही मला तुझी कृपा हवी आहे.

इराणमधील मुलींच्या प्राथमिक शाळेवर अमेरिकेने बॉम्ब टाकला. दिडशे मुली मरण पावल्या. सौदी अरेबीयातील तेलाची कंपनी उद्‌ध्वस्त झाली. अनेक कामगार मरण पावले. येथे त्यांचे चेहरे कोणी पुसावेत ? याचा विचार आपण सर्व करु या. जेव्हा आपण एखाद्याचा चेहरा पुसतो, त्याला मदत करतो, त्याच्या जीवनात जगण्याचा आनंद निर्माण करतो तेव्हा हा आनंद दोघांनाही मिळत असतो हीच पुनरुत्थानाची आपणा सर्वास हाक आहे. चला तर हया हाकेला 'ओ' देऊन पुनरुत्थानाचा आनंद मिळवूया. शेवटी खालील कवितेच्या स्फूर्तीदायक ओळी मी सर्व मैत्रिणींसाठी लिहित आहे.

''मी आहे रणरागिणी,
दया मज हाती विश्वाच्या रथाची दोरी
हाकीन मी विश्वासाने, धैर्याने ।
खुणाविती मज प्रतिदिनी नव्या दिशा, नवी क्षितिजे,
नाही मी अबला, काढीन काट्याकुट्यातून मार्ग येणारी आव्हाने झेलत आनंदाने.''

◆


**प्रेमळ स्मरणार्थ**





**ख्रि.मिंगेल सेबेस्टीयन आल्मेडा**
जन्म : २९-०४-१९४०
मृत्यू : २०-१०-२०१६

**ख्रि.जॉना मिंगेल आल्मेडा**
जन्म : २८-०७-१९३८
मृत्यू : ३०-१२-२००६

**ख्रि. पॅट्रिशिया पॉल नुनीस**
मृत्यू : २२-०८-२०१६

**आम्हांसाठी सार्वकालिक निवासस्थान स्वर्गात आहे.**
*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*
तुमची नातवंड व कुटुंबीय

***सर्वांना संत ईस्टर सणाच्या प्रार्थनामय शुभेच्छा!***
**थेरॉन जोसेफ मिनेझिस, हॅड्रीयस जोसेफ मिनेझिस**
**रेमंड लॉरेन्स लोपीस, टेरेन्स लॉरेन्स लोपीस**
**लेरॉय मायकल घोन्सालवीस**

*अशी पाखरे येती आणिक स्मृति ठेवूनी जाती ॥*
**प्रेमळ स्मरणार्थ**





**स्व. रेमंड थॉमस लोपीस**
जन्म:२८-१२-१९६३
मृत्यू: २६-०७-१९८५

**स्व. नाताळ थॉमस लोपीस**
**व**
**स्व. थॉमस आलेक्स लोपीस**

ख्रि. आलेस व रोजीन लोपीस आणि ख्रि. आलेस व दुमी लोपीस
आणि मयत कुटुंबीय व पूर्वज
ख्रि. मायकल, रोजीन, थॉमस, कैतान व सांतान लोपीस
स्व. जेकब, मेरू, विल्सन, जोज्या व मायकल लोपीस,
ख्रि. डॉमणिका (पापी) व मायकल डिमेलो
ख्रि. तेरेज फ्रान्सिस आल्मेडा व स्व. अर्सला डेव्हीड आल्मेडा ।
ख्रि. इजाबेल व पास्कोल लोपीस ।
शुद्धीस्थानांतील व निराधार आत्म्यांसाठी

**आम्हांसाठी सार्वकालिक निवासस्थान स्वर्गात आहे.**
*हे प्रभो, ह्या सर्वांना तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती लाभो!*

***सर्वांना ईस्टर सणाच्या प्रार्थनामय शुभेच्छा!***
रेमंड व टेरेन्स लोपीस
रोमिल्डा व क्लेटस घोन्सालविस व बेबी रेंझा, रिशेल व कुटुंबीय

# भूमिका

- मीना परेरा



उपवासकाळ हा प्रार्थना, मनन, चिंतनाचा काळ, वैयक्तिकरित्या स्वतःच्या अंर्तमनात डोकावून पाहण्याचा काळ. म्हणूनच या काळात आध्यात्मिक शिबीरे, प्रार्थनासभा आयोजित केली जातात. त्यास लोकांचा प्रतिसादही खूप असतो. क्रुसाच्या वाटेच्या भक्तीद्वारे ख्रिस्ताचे दुःखसहन आपण या काळात आठवड्यातून दोन-तीन वेळातरी ऐकत असतो. अगदी भक्तिमय वातावरणात दुःख सहनाच्या वाटेवरील ख्रिस्ताबरोबर असलेल्या व नसलेल्या अनेक व्यक्तिरेखा आपल्या डोळयासमोर असतात. वेरोणिका, सिमोन सिरेनीकर यांच्या भूमिका नजरेसमोर येतात तेव्हा भावभक्तीने आपोआपच हात जोडले जातात. तर जेव्हा ज्युदासची व्यक्तिरेखा व येशूला मारणारा, येशूचा छळ करणारा जमाव डोळ्यासमोर येतो, तेव्हा मन अस्वस्थ होते व नकारात्मक भावना निर्माण होते. मनोमन विचार येतो मी तिथे असतो / असते तर ......

त्या काळात तिथे आपण असतो तर ख्रिस्ताला मदत केली असती किंवा होणाऱ्या अन्यायाविरुध्द आवाज उठविला असता ही कल्पना करणे सोपे आहे. कारण हे घडून गेले आहे.

आजच्या काळातही अशा नकारात्मक व्यक्तिच्या भूमिका वेगवेगळ्या कृतीतून कळत नकळत वठवल्या जात असतील तर आपली भूमिका काय ?

वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय हे आपल्या जीवनाचे वेगवेगळे पैलू आहेत, भाग आहेत. या भागात अनेक वेळा आपल्याला ज्युदासच्या भूमिका त्रास देतात. केवळ पैशाच्या लोभापायी ज्युदासने ख्रिस्ताचा विश्वासघात केला. मानवी जीवनातून ज्यूदास खरंच नष्ट झालाय का ? आज कोणत्या प्रवृत्ती विकल्या जात आहेत ? सत्य परिस्थिती जाणून न घेता एखाद्या व्यक्तीची बेअब्रू करणे. त्या व्यक्तिबद्दल गैरसमज पसरविणे, सातत्याने टीका करणे इथे आपण त्या व्यक्तिचे चारित्र्य, शील विकतो. तिचं मानसिक आरोग्य विकतो.

तिरस्काराची, मत्सराची भावना, पूर्वग्रहदुषित भावना मनात ठेवणे म्हणजे ख्रिस्ताचे प्रेमाचे मूल्य आपण विकतो. असत्याच्या वाईट मार्गावर चालणाऱ्याला आपल्या जीवनात साथ देणे म्हणजे ख्रिस्ताच्या ''मार्ग, सत्य व जीवन मीच आहे'' या पवित्र वचनाला विकण्यासारखं आहे. कौटुंबिक कलह म्हणजे ख्रिस्त सभेला अपेक्षित सुसंस्कारित, आदर्श कुटुंब नाकाराण्या सारखे आहे.

समाजात गोर-गरीब, उपेक्षित अशा लोकांवर अन्याय केले जातात. महिलांचे शोषण केले जाते.

भ्रष्टाचाराला शिष्टाचार समजले जाते. स्वातंत्र्य, समता, बंधूता ही मूल्ये नाकारली जातात, तेव्हा ख्रिस्ताची मूल्ये विकली जातात. याचाच अर्थ असा आहे की, अशा निरनिराळ्या कृतीतून आपल्या सर्वांच्या जीवनात कधी कधी ज्युदास पुन्हा पुन्हा जिवंत होत असतो. आज घडणाऱ्या गोष्टी आपल्या नजरेसमोर घडत आहेत. कळत नकळत आपला सहभाग असेल तर आता आपण स्वतःला प्रश्न विचारु शकतो का की आज मी आता तिथे असतो / असते तर....

दुःखसहनाच्या या काळातून पुनरुत्थानाकडे जर आपल्याला वाटचाल करायची असेल तर फक्त या चाळीस दिवसापुरतीच याची उजळणी करुन चालणार नाही. तर आपल्या भूमिका बदलाव्या लागतील.

ज्युदासने ख्रिस्ताचा विश्वासघात केला पण नंतर त्याला निराशेने ग्रासले, त्याने आत्महत्येचा मार्ग निवडला. पेत्राने येशूला नाकारले पण चूक लक्षात आल्यानंतर पश्चाताप केला व पुन्हा ख्रिस्ताच्या मार्गावर नव्या जीवनाची सुरुवात केली, आणि ख्रिस्तसभेचे नेतृत्व केलं, खिस्ताचं कार्य पुढे नेले.

मानवी जीवनातील विविध भागात नकारात्मक कृतीमधून जिवंत होत असलेल्या ज्युदासी वृत्तींचा शोध घेण्याची गरज आहे. ती काळाची गरज आहे. म्हणून प्रत्येकाने स्वतःला प्रश्न विचारायचा आहे मी इथे आहे तर....नाहीतर आपण फक्त दुःखसहनाच्या आठवणींना उजाळा देत राहू. जे खूप सोपे आहे.

ख्रिस्ताच्या दुःखहनाच्या वेळी मी नव्हतो / नव्हते. पण आज मी आहे. माझी भूमिका काय ?

◆

# EVERY BREATH IS A HIDDEN TREASURE!

Lotus grows in the water,
its roots are in the dirty water,
but it does not conform to the dirt.
It comes out as a beautiful flower and stands joyfully,
keeping its head straight, looking up to the sky.
Life is a journey.
with many difficulties on the way.
Very often we lose hope
and think its the end.
Our life is an open book.
and each day we are writing a page.
which records good or evil for the final account.
Time past is gone, has fled beyond recall.
time present is the only time for you.
Make yourself tough to face the reality of life.
Look up high, look up to heaven.
where a glorious reward awaits us.
provided we remain strong in our ideas and convictions.
Don't wait for something to turn up,
but turn it up yourself.

**- Sylvia Colaco**

# मी जगून केले कार्य काय ?

- सौ. अनिता डिमेलो

प्रत्येक व्यक्ती काही महान किंवा उत्तुंग कार्य करू शकत नाही पण जीवन कृत्तार्थ करण्यासाठी त्याचीच गरज असते असे नाही परंतु आपल्या कुवतीनुसार जिथे आणि जसे जमेल तसे चांगले वागावे. इतरांना मदतीचा हात व प्रेमाचा शब्द द्यावा या कृतीचे पडसाद कुणाच्या तरी स्मृतीत कदाचित खूप काळ उमटत राहतील.

माझ्या वाचनात आलेली वरील सुंदर वाक्ये आणि त्यानंतर माझ्या डोळ्यासमोर येशूला क्रूस वाहण्यास मदत करणाऱ्या सिमोन सिरेनीकरचा चेहरा आला. येशू त्याच्यासाठी अनोळखी होता: तो येशूचा मित्र किंवा नात्यातला नव्हता. त्याची इच्छा नसतानाही रोमन शिपाई येशूचा क्रूस वाहण्यास त्याला भाग पाडतात. परंतु येशूच्या कृपेचे सहाय्य मिळताच सिमोन सिरेनीकरला क्रूस हलका वाटला म्हणजेच त्याने मनापासून क्रूसाचा स्विकार केला.

आपण नेहमी पाहतो की आपल्या समाजात, कामाच्या ठिकाणी, कुटुंबात कित्येक व्यक्ती सिमोन सिरेनीकरची भूमिका वेगवेगळ्या रुपात पार पाडीत असतात. गरजवंत व अडचणीत असलेल्या लोकांना मदत करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवित असतातः आपल्या चर्चमधील विन्सेंट दि पॉल, मेडीकल फंड, कॅन्सर फंड, प्रार्थना संघ अशा विविध संघटना नेहमीच गरजू लोकांना मदतीचा हात देतात. आजारी लोकांची सेवा करणे, वृद्ध लोकांना त्यांच्या दैनंदिन कामात मदत करणे, अभ्यासात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, रक्तदान करून रुग्णाचे प्राण वाचविणे. आताच ऐकलेली एक घटना: केरळमधीन एका दहा महिन्याच्या मुलीचा अपघात झाला. डॉक्टरांनी तिचा ब्रेन डेड झाला आहे असे सांगितल्यानंतर अशा कठीण परिस्थितीत तिच्या पालकांनी एक धाडसी निर्णय घेतला, मुलीचे अवयवदान करण्याचा. त्यामुळे पाच लहान बालकांना जीवनदान मिळाले. आपल्या गावात देखील अनेक कुटुंबांनी आपल्या प्रिय व्यक्तीच्या मृत्यू पश्चात अवयवदान, त्वचादान व नेत्रदान केले आहे. मिशन विभागात फादर्स, सिस्टर्स खडतर जीवन जगत असतात. लोकांची सेवा करीत असताना त्यांच्यावर हल्ले देखील होतात. परंतु भिती न बाळगता ते आपले कार्य धैर्याने करीत असतात. या सर्व कार्यासाठी परमेश्वराच्या आशीर्वादाची गरज असते. काही लोक कळकळीने प्रार्थना करतात: प्रार्थनेचे बळ देतात. हे बळ म्हणजेच सिमोन सिरेनीकरची भूमिका बजावत असतात.

क्रुसाच्या वाटेच्या भक्तीत आपण ऐकतो की, मी तिथे असतो तर? तर कशाला, आपण तिथे हजर आहोतच. चांगल्या कार्यासाठी येशू आपल्याला नेहमीच बोलावित असतो. आपल्या जीवनात येशूला केंद्रस्थानी मानले तर मी फक्त माझा न राहता इतरांचा विचार करू शकेन व खऱ्या अर्थाने पुनरुत्थानाचा अनुभव आपणां सर्वांना घेता येईल.

◆

# चिंतन

**सौ. रेश्मा रेमंड डिसोजा**

उपवासकाळ म्हणजे आत्मपरीक्षणाचा, अंतर्मनाचा वेध घेण्याचा, स्वतःशी संवाद साधण्याचा सुवर्णकाळ. शांत राहून, चिंतनातून आपली नव्याने ओळख करून देणारा हा ऋतू. त्याग आणि प्रेमाचा संदेश देणारी क्रुसाची वाट प्रत्येकाला चालावी लागते, त्यातूनच तारणाची पहाट दृष्टीपथात येते.

**"येशू आणि मरियेची भेट "**

कालवारीच्या वाटेवर क्रुस घेऊन चालत असता, येशूची आपल्या दुःखी मातेशी भेट होते. क्रुसाच्या वाटेवरील चौदा स्थानांपैकी हे चौथे स्थान, आपणां प्रत्येकाच्या जीवनाचे अविभाज्य अंग आहे. कधी आपण अंतःकरणातून आरपार तलवार भोसकलेली मरीया माता असतो, तर कधी क्रुसाच्या भाराने व्याकुळ झालेला ख्रिस्त. वेदनेच्या मार्गावरील हा क्षण अत्यंत भावनिक असतो. उभयतांचे दुःख पाहून होणाऱ्या वेदना, जाणवणाऱ्या संवेदना निराशेच्या गर्तेत नेतात. ही वाट कधीच संपणार नाही, अशा विचारांचे वादळ जीवनाची उलथापालथ करते. निःशब्द स्पर्शाने एकमेकांचे दुःख हलके करण्याचा प्रयत्न आपण करतो का ?

आज समाजात विविध रूपांमध्ये असे मायलेक नजरेस पडतात. व्यसनाधीन, कुसंगतीला बळी पडलेली तरुणाई, मानसिक आजारांनी ग्रस्त मुले, समाजातील स्पर्धांना, आव्हानांना, कॉर्पोरेट राजकारणाच्या जाचाला कंटाळून हवालदिल झालेली लेकरे, कौटुंबिक जबाबदाऱ्या पेलण्याचे त्राण नसलेले कोवळे खांदे, ऑनलाईन आर्थिक SCAM घोटाळयात अडकलेली, फसलेली तरुण पिढी हे सारे क्रुस वाहणाऱ्या येशू ख्रिस्ताची साक्ष देतात.

आजची ही नवी पिढी सावरण्याचे, उभारण्याचे सामर्थ्य पालकांना लाभायला हवे. पवित्र मरियेप्रमाणे सहनशीलता, श्रद्धा आणि चिकाटीने परमेश्वरावरील विश्वासात दृढ व्हायला हवे.

त्याग, कष्ट आणि निःस्वार्थी प्रेमाने कुटुंबरूपी बाग फुलविणारे आईवडील जेव्हा दुर्धर आजाराने ग्रस्त होतात, उतारवयात अपमानित केले जातात, निराधार होतात, मुलांच्या अनैतिक विवाहबाह्य संबंधांमुळे कुटुंब पोखरताना पाहतात, तरुण मुलांना वेळेचे भान न राखता सोशल मिडियामध्ये रममाण झालेले पाहतात, तेव्हा तेव्हा सारी दुःखे हृदयात साठवून पुत्रासाठी उभ्या असलेल्या मातेची भेट होत राहते.

दुःख, चिंता, ताण सहन करणाऱ्या या पालकांना मायेच्या स्पर्शाची गरज असते. 'झाकली मूठ' घेऊन ते समाजात मुखवटा घालून वावरत असतात. त्या मुखवट्यामागील अश्रू आपल्याला पुसता येतील का ? नातेवाईक अन् मित्रमंडळी यांनी दिलेला वेळ, प्रेमाचे दोन शब्द त्यांच्या जीवनाचा भावनिक आधार बनू शकतील.

मानवी जीवन ही परमेश्वराकडून मिळालेली अमूल्य देणगी आहे. ह्या जीवनातील निखळ आनंदाला, उत्साहाला, समाधानाला पारखे झालेल्या मायलेकांसाठी आपण 'सिमोन सिरेनीकर' बनू शकतो का ? त्यांच्या सोबत उभे राहण्याचे सामर्थ्य व कृपा तारणादायी येशूकडे मागू या. ◆

# परीक्षा

**जॉन लोपीस, रोशनी**

हिंदु लोकांचा ''श्रावण'' तीस दिवसांचा, मुस्लिम लोकांचा ''रमझान'' तीस दिवसांचा मग आपला ख्रिश्चन लोकांचा 'कोरेजमा' चाळीस दिवसांचा का....? हा माझाच नाही, तर बहुतेक आपल्या सर्वांच्या मनातील प्रश्न आहे, जो कदाचित विचारावासा वाटतो, पण विचारण्याचे धाडस कोणी करत नाही. असो. असे बरेचशे जगभरात अनेक धर्म आहेत, त्या सर्वांच्याच धर्मांत नक्कीच प्रायश्चित काळ वर्षातून एकदा तरी येतच असेल, मग तो महिन्याभराचा असो की त्यापेक्षा जास्त किंवा कमीही असू शकतो. आत्मपरिक्षण म्हणून जगभरातील प्रत्येक व्यक्ती हयाबाबतीत थोडे दिवस का होईना पण आपापल्या देवावरील विश्वासानुसार व आपण केलेल्या बऱ्या वाईट गोष्टींबद्दल हिशोब म्हणून पाळण्याचा प्रयत्न नक्कीच करत असतील. आजकालच्या धावत्या युगातील जीवन शैलीमुळे बहुतेक लोक हे आपल्या नित्य नियमाच्या खाण्यापिण्याच्या व झोपण्याच्या बाबतीत तेवढे काटेकोर नाहीत, जेवढे आपले पूर्वज ''सुशेगाद '' होते. हयाला कारणही तेवढेच महत्वाचे आहे. पूर्वी मेहनतीची कामे जास्त व तीही घराबाहेर, शेतात, बागेत, नोकरीच्या निमित्ताने कंपनी, ऑफिस अशा ठिकाणी, जेथे नैसर्गिक हवा खेळती असायची, ज्यामध्ये ऊन, थंडी हयांचा कधी शरीरावर परिणाम होत नव्हता. खाण्या-पिण्यात भेसळयुक्त गोष्टींचा समावेश नसल्यामुळे आजारपणाच्या तक्रारी नसायच्या. लोक तंदुरुस्त असायचे.

खरं तर उपवासकाळ हा प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनात जे काही वाईट केले आहे, ज्यामुळे आपल्याला त्रास होतो किंवा माझे सर्वकाही चांगले चाललेले आहे हया भ्रमात दुरावलेले आहेत हया सर्वांना विचार करावयास दिलेली ही संधी, ज्याचा आपण खरं आपल्यापरीने प्रयत्न करुन त्या गोष्टींपासून दूर रहाण्यासाठी झुरतो, त्याग करतो, ही जणू एक प्रकारची आपलीच आपल्यासाठी असलेली परिक्षाच आहे. आपल्याला आपले आयुष्य बदलण्याचा, चांगले ते आत्मसात करण्याचा व वाईटापासून दूर राहण्याची चालून आलेली संधी असते. जसे आपण प्रायश्चित ? साक्रामेन्ताद्वारे आपली सर्व पापे सांगून परत न करण्यासाठी क्षमेची याचना करतो, अगदी तशाच प्रकारे हया उपवास काळात आपल्याला अशीच संधी मिळत असते, त्याचा जो फायदा घेतो त्याचे नक्कीच ''कल्याण'' होते. हे बऱ्याचशा हया दिवसातील प्रवचनांमध्ये उदाहरणाद्वारे सांगितले जाते. शेवटी अशी विशेष करुन उपवास काळातील प्रवचने ''ज्याला कान आहेत तो ऐकतो'' व पश्चातापी अंतःकरणाने ती आत्मसातही करतो.

उपवास काळातील प्रवचनांद्वारे आपल्याला सांगण्यात येते की आपआपसातील हेवेदावे विसरुन एकमेकांबरोबर ''अबोला'' असल्यास समोरुन जाऊन त्याबद्दल माफी मागून ''अबोला'' दूर करुन मनःशान्ती मिळवण्याचा प्रयत्न करा. हयात तुम्हाला कधी पटकन यश येणार नाही. पण घाबरु नका किंवा मीच का जाऊ माफी मागायला तो लहान आहे, मी मोठा आहे ही मनातील चंचल वृत्ती बाजूला सारून नम्रपणा धारण करुन मनात सद्बुध्दी ऐवजी प्रेमभावना समोरच्याविषयी अंगिकारली तर आपण नक्कीच त्यात विजयी होतो व आपली बऱ्याच वर्षापासून, महिन्यापासून किंवा दिवसापासून झालेली, झोपमोड परत आपल्याला ''सुशेगाद '' झोपेकडे झेपावण्यास मदत करते. ज्यामुळे आपले अस्वस्थ जनजीवन आनंदी जीवनाकडे वळते. शेवटी ''नम्रता'' हा माणसाच्या जीवनातील सर्वात मोठा केंद्रबिन्दू आहे, त्यावर जो विसंबून त्याप्रमाणे वागतो, तो आयुष्यात कधीच एकटा पडत नाही.

सर्वांना ''पास्का'' सणाच्या हार्दिक शुभेच्छा !

◆

# वेदनेतून पुनरुत्थानाकडे

**नीना डेनिस डिमेलो**

गुरुवार दिनांक ७ ऑक्टोंबर २०२५ सकाळी आई घरात पडल्याचा फोन आला. मी मुलासोबत माहेरी पोहचले. आई धीरगंभीर चेहऱ्याने शांत एकाच ठिकाणी बसून होती. तिला बिलकूल चालता येत नव्हते. ॲम्ब्यूलन्स बोलावून अटेंडरच्या कौशल्याने ते शक्य झाले आणि पुसटशीही शंका मनाला शिवली नाही. परंतू X-RAY ने पूर्ण हाड मोडल्याचे जाहीर झाले ? सर्व शारीरिक तपासण्या करुनच ऑपरेशन करावे लागेल असे डॉक्टर म्हणाले. त्याही परिस्थितीत तिने ते सहजगत्या म्हटले की माझे रिपोर्ट नॉर्मल येतीलच पण ऑपरेशन करावे लागले तर केलेच पाहिजे. तिच्या या वक्तव्याने आमचाही मार्ग सुकर झाला. संध्याकाळपर्यंत सर्व नातेवाईकांना माहिती झाली व हॉस्पीटलमध्ये तिला भेटण्यासाठी रीघ लागली. सर्वांशी अगदी ख्यालीखुशालीने ती वार्तालाप करीत होती. दुसऱ्याच दिवशी ऑपरेशन करायचे होते. फादरांनी येऊन आईला आशीर्वाद दिला आणि घाबरु नका असं आम्हाला सांगून ती ऑपरेशन थिएटरमध्ये गेली. अगदी निर्धास्त... दोन तासांनी बाहेर काढताच आम्हाला डॉक्टरांच्या आधी तिनेच सांगितले सर्व काही ठीक झाले. गेल्या काही वर्षांपासून हिंडणे-फिरणे कठीण झाल्यामुळे अनेक नातेवाईकांना भेटू शकली नव्हती त्या सर्वांनी हॉस्पीटलमध्ये येऊन तिची भेट घेतली.



घरी जवळपास दोन महिने सर्वकाही खाटेवरच करावे लागले. दरम्यान ती थोडीशी प्रेमाने अबोल व नाराज दिसायची पण घरातील सर्वांनी तिची खूप काळजी घेतली. दोन महिने फिजीओथेरपी देवून तिचा आत्मविश्वास वाढवला. स्वतःचे स्वतः करु लागली आहे. पुन्हा नवा जोम संपादन केला आहे. पुन्हा तिचा उल्हासित स्वभाव फूलू लागला आहे. वेदना असहय होत्या.. कोणी त्या वेदना कमी करु शकत नव्हते, तिच्या निराशेमध्ये तीच स्वतः आशादायी होती,... होईल हळूहळू....असचं म्हणायची सारखी ...आता खरोखरच त्या वेदनेतून तिने पुनरुत्थानाचा प्रकाश पाहिला. खाटेवरील एकाकीपणात कबरेचा अंधार पाहिला ...वेदनेच्या तीव्र दुःखात पवित्र मरियेचा हुंदका अनुभवला .... आधी गुड फ्रायडेनंतर मग ईस्टर तिच्याही जीवनात पुन्हा आला म्हणून त्या विधात्याचे शतशः आभार.... आई पुन्हा उभी राहिली.. सगळयांच्या प्रयत्नाने.... प्रेमाने.. आणि स्वतःवरील व परमेश्वरावरील दुर्दम्य विश्वासाने....हॅप्पी ईस्टर....

◆

# क्रूस ते क्रांती

*(एका नव्या युगाचा उदय)*

**ज्युली आल्मेडा**

ईस्टरचा सण साजरा करत असताना, आपण दोन हजार वर्षांपूर्वीच्या एका ऐतिहासिक घटनेचे स्मरण करतो. "दुःखसहनाकडून पुनरुत्थानाकडे" हा प्रवास केवळ इतिहासाच्या पानांवर मर्यादित नाही, तो आपल्या प्रत्येकाच्या दैनंदिन संघर्षाची गाथा आहे. आपण अनेकदा ईस्टरला "दुःखाचा अंत" मानतो, पण प्रत्यक्षात ईस्टर म्हणजे "दुःखाचे रूपांतर क्रांतीत करण्याची कला" आहे. आपल्या आयुष्यात जेव्हा संकटे येतात मग ती आर्थिक असोत, शारीरिक असोत किंवा मानसिक तेव्हा आपल्याला वाटते की आपला "क्रूस" फार जड आहे. पण बायबल आपल्याला सांगते, "कारण आपल्या या अल्पशा व हलक्या संकटाने आपल्यासाठी अतिशय भारी व अनंतकाळ टिकणारा गौरवाचा साठा सिद्ध होत आहे." (२ करिंथकरांस ४:१७).




आपल्या आयुष्यातील कठीण काळ हा आपल्याला संपवण्यासाठी आलेला नसून, आपल्यातील सुप्त शक्तींना जागे करण्यासाठी आलेला असतो. ज्याप्रमाणे जमीन नांगरल्याशिवाय पेरणी करता येत नाही,तसेच दुःख सहन केल्याशिवाय "पुनरुत्थानाचा" आनंद घेता येत नाही. जेव्हा येशूला थडग्यात ठेवण्यात आले, तेव्हा जगाला वाटले की तो त्याचा "अंत" आहे. पण ती कबर नसून एक "गर्भाशय" होते, जिथे एका नवीन युगाचा जन्म होत होता. प्रभू येशूने म्हटल्याप्रमाणे, "मी तुम्हास खरोखर सांगतो, गव्हाचा दाणा जमिनीत पडून मेला नाही तर तो एकटाच राहतो, पण जर तो मेला तर पुष्कळ फळ देतो." (योहान १२:२४)

जेव्हा आपण निराशेच्या अंधारात असतो, तेव्हा समजा की आपल्या पुनरुत्थानाची प्रक्रिया सुरू झाली आहे. तो काळ शांततेचा असला तरी तो "निर्मितीचा" काळ असतो. देवाची शांतता म्हणजे त्याचे अनुपस्थित असणे नव्हे, तर तो पडद्यामागे आपल्या विजयाची तयारी करत असतो. पुनरुत्थानानंतर ख्रिस्ताने आपल्या जखमा पुसून टाकल्या नाहीत, त्याने थॉमसला आपल्या हातावरील आणि कुशीतील जखमा दाखवल्या. हे आपल्याला एक महत्त्वाचे सत्य सांगते की, "आपल्या जखमा या आपल्या पराभवाच्या खुणा नसून, आपण जिंकलेल्या लढाईचे पुरावे आहेत. बायबलमध्ये म्हटल्याप्रमाणे, "त्याच्या जखमांनी तुम्हाला आरोग्य लाभले आहे." (१ पेत्र २:२४).

आपल्या जीवनातील अपयश, अपमान किंवा आजारपण यातून जेव्हा आपण बाहेर पडतो, तेव्हा त्या जखमांकडे अभिमानाने पहा, कारण त्या जखमाच आपल्या विजयाची साक्ष देतात. खरी क्रांती हीच आहे की, ज्या मृत्यूने आपल्याला घाबरवले होते, त्याच

मृत्यूचा आता पराभव झाला आहे. "अरे मरणा, तुझा विजय कोठे ? अरे मरणा, तुझी नांगी कोठे ?" (१ करिंथकरांस १५:५५)

या वचनाप्रमाणे "क्रूस ते क्रांती" हा प्रवास आपल्याला शिकवतो की राखेतून पुन्हा फिनिक्स पक्ष्याप्रमाणे झेप घेणे शक्य आहे. ही क्रांती केवळ थडग्याबाहेर येण्यापुरती मर्यादित नाही, तर ती आपल्या जगण्याच्या पद्धतीत आणि विचारांत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणारी आहे. स्वार्थाचा मृत्यू झाल्याशिवाय प्रेमाचे पुनरुत्थान होत नाही आणि भीतीचा त्याग केल्याशिवाय खऱ्या धैर्याचा जन्म होत नाही. या ईस्टरला आपण आपल्या मनातील विझलेली उमेद पुन्हा चेतवूया. "पुनरुत्थित येशूप्रमाणे उठा, आपल्या जखमांना आपले सामर्थ्य बनवा, निराश झालेल्यांना धीर द्या आणि जगाला आत्मविश्वासाने सांगा, "माझ्या आयुष्यातील प्रत्येक 'क्रूस' म्हणजे माझा 'पराभव' नसून, माझ्या जीवनातील एका महाक्रांतीचा तो 'विजयोत्सव' आहे!"

प्रार्थना : हे प्रभू, आमच्या आयुष्यातील संघर्षाच्या काळात आम्हाला तुझा हात धरून चालण्याचे बळ दे. आमचा 'क्रूस' हा आमच्या क्रांतीची आणि परिवर्तनाची सुरुवात आहे, हे सत्य स्वीकारण्याचे धैर्य आम्हाला दे. तुझ्या पुनरुत्थानाचे सामर्थ्य आमच्या कार्यातून आणि शब्दांतून प्रकट होऊ दे. आमेन. He is Risen! तो जिवंत आहे! "त्याच्या" जिवंत असण्याने आपल्यातील प्रत्येक विझलेली उमेद पुन्हा जिवंत होवो. आपणास आणि आपल्या परिवारास ईस्टरच्या "पुनरुत्थानमयी" शुभेच्छा!

A Blessed and Joyful Easter to all! ◆

# स्त्री शक्तीला मानाचा मुजरा

संत मायकल चर्चमध्ये प्रथमच आंतरराष्ट्रीय महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या विशेष प्रसंगी महिलांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कनोशियन सिस्टर्स तसेच गावातील महिला जॉना डिमेलो व फिलोमीना घोन्सालवीस यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली. महिला दिनानिमित्त केक कापण्याचा आनंददायी प्रसंग हा कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरला. या उपक्रमामुळे संत मायकल चर्चमध्ये महिला दिन साजरा करण्याची एक सुंदर परंपरा सुरू झाली आहे.महिला दिनाचे मुख्य आकर्षण म्हणजे महिलांसाठी रस्सीखेच (टग ऑफ वॉर) खेळाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच पैठणीचा खेळ हा कार्यक्रमाचा केंद्रबिंदू ठरला. पैठणी जिंकण्यासाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागी महिलांना सहभाग पदक (मेडल) देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच विजेत्या आणि उपविजेत्या संघांना चषक देऊन गौरविण्यात आले.वेळोवेळी मार्गदर्शन करून नवीन कार्यक्रम करण्यास प्रेरणा देणारे आपले मुख्य धर्मगुरू फा. असीस रॉड्रिक्स आणि सहायक धर्मगुरू यांचे मनःपूर्वक आभार. सर्व ग्रामस्थांचे प्रेम, विश्वास आणि एकजूट हेच आमचे खरे प्रेरणास्थान आहे. याच प्रेरणेने आम्हाला सतत नवीन उपक्रम राबविण्याची ऊर्जा मिळत राहते.

**- प्रियांका कोलासो**


**संत मायकल चर्च स्पोर्टस कमिटी**

# आंतरिक परिवर्तनाचा काळ

**स्वीटी कोलासो**

''माती अससी मातीत मिळसी
मनुजा आठव तू हेचि , मनुजा आठव तू हेचि''

हे गाणं आपण प्रायश्चित्त काळातच म्हणतो कारण प्रायश्चित काळ हा आपल्यासाठी परमेश्वराने दिलेली एक सुवर्णसंधी आहे. ह्या काळात आपण आपलं स्वतःचं आत्मपरिक्षण करु या. आपण दुसऱ्याला कशाप्रकारे उपयोगी पडू शकतो याचा विचार करु या. गोरगरिब, अनाथ यांच्यासाठी काहीतरी करण्याचा प्रयत्न करु या. कारण ह्यातच परमेश्वराचे आभार मानण्याची आपल्याला संधी असते.




हा चाळीस दिवसाचा काळ परमेश्वराने आपल्यासाठी राखून ठेवलेला आहे. कारण आपण त्याची मुले आहोत व परत त्याच्याकडे जाणार आहोत. चाळीस आकडा हा परमेश्वरासाठी किती महत्वाचा आहे हे आपल्याला जुन्या करारापासून देवाने सांगितले आहे. नोहाला परमेश्वराने जेव्हा तारु बांधावयास सांगितले तेव्हा पृथ्वीवर चाळीस दिवस जलप्रलय होणार असे सांगितले. मोशे चाळीस दिवस मिसर देशात व चाळीस दिवस वाळवंटात राहिला. एलीयाने चाळीस दिवस उपवास केला. निनवे शहराला चाळीस दिवस योनाने पश्चात्तापासाठी वेळ दिला. यहेज्केल संदेष्टा यहुद्यांची पापे दर्शवण्यासाठी चाळीस दिवस उजव्या कुशीवर झोपला. येशू ख्रिस्ताने चाळीस दिवस अरण्यात उपवास व प्रार्थना केली. आपण सुध्दा ह्या चाळीस दिवसात आपल्या भावा-बहिणीत, शेजाऱ्यात सलोख्याचे, त्यागाचे बी पेरु या म्हणजे आपल्याला प्रेम व शांती मिळेल, ती पण खरी स्वर्गीय शांती.

कितीतरी आपल्या आया बहिणी आपल्या कुंटुबात अशाप्रकारे दुःखसहन करत असतात. कितीतरी पती दारुच्या आहारी गेले आहेत. कितीतरी मूलं वाईट संगतीत गेली आहेत. संत अगस्टीन तर वयाच्या तेहत्तीसाव्या वर्षी परमेश्वराकडे आला. कारण संत मॉनिका हिने प्रयत्न सोडले नाहीत. ती प्रार्थना, उपवास व रडून परमेश्वराचा धावा करीत असे. व आपल्या मुलाला एक चांगला बिशप व धर्मपंडित झालेला पाहते, म्हणूनच शेवटी म्हणतात, 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे.'

ह्या उपवास काळात आपण प्रार्थना, उपवास, त्याग, दानधर्म करुन परमेश्वराच्या अधिकाअधिक जवळ यावे म्हणून प्रयत्न करु या. कारण जगात युध्द चालू आहे त्याचे परिणाम सर्वांना भोगावे लागत आहेत. सामान्य जनता त्यात चिरडली जात आहे. महागाई वाढत आहे. पैसा कमावण्यासाठी कसलीही पर्वा केली जात नाही. म्हणून ह्या उपवास काळात आपण विचार करु या. की, आपण या जगाचे प्रवासी आहोत कारण आपला प्रवास संपला की परत आपल्याला स्वर्गीय पित्याकडे जायचे आहे, तेव्हा आपण आपल्या बरोबर काय घेऊन जाणार आहोत ? यावर मनन चिंतन करु या. जसे पक्षी संपूर्ण दिवस आकाशात भ्रमण करतात व संध्याकाळी आपल्या घरट्यात परत येतात. तसेच आपण आपल्या मनात चांगले विचार घेऊन ह्या ईस्टरला एक वेगळा इस्टर

◆

# दुःखावर विजयाची कहाणी

सांतान डिमेलो

तो जन्माला आला तेव्हा सर्व ठिकाणी आनंदी-आनंद कारण तो पूर्वीच्या काळचा मुलगा होता. त्या काळी मुलगा-मुलगी हया मध्ये समानता नव्हती. भेद-भाव केला जात असे. मुलगा झाला की आनंदच आनंद. परंतु एक दिवस ह्या आनंदावर विरंजण पडले सगळ्या ठिकाणी दुःखाचे सावट पसरले. कारण तो वारंवार आजारी पडू लागला. परिस्थिती नसताना पोटाला चिमटा घेऊन त्याला डॉक्टरकडे न्यावे लागत असे. कोणी म्हणाले की त्याला करणी केली आहे. त्याला गोट्याकडे न्या. आईने आपल्या बाळाचा जीव वाचावा म्हणून त्याला मंत्र-तंत्र करणाऱ्याकडेसुद्धा नेले. त्यांनी त्याच्यासाठी पान करावयास सांगितले. आईची भाबडी माया तिने घरी येऊन पानात ठेवायच्या वस्तू आणल्या व ते पान त्यांच्या अंगावरुन घेऊन ओटीवर ठेवले. संध्याकाळी बाबा कामावरुन आले. बहिणीने बाबांना सर्व हकीकत सांगितली. बाबाने रागाने लाथ मारुन त्या पानाला ओटीवरुन खाली फेकले. तेव्हापासून मंत्र-तंत्र विषय बंद. शेवटी मोठा मामा धावून आला. कारण बहिणीचीच ती माया. स्वतःला एक मुलगी व आठ मुलं असतांना, मामांनी हा आपला मुलगा आहे असे सांगून जे.जे. हॉस्पिटलात त्याला ॲडमिट केले. आईला त्याची देखभाल करण्यासाठी केअर टेकर म्हणून ठेवले. त्याच्यावर उपचार सुरु झाले. रोगाचे निदान झाले नाही. पण औषधोपचारांनी त्याला बरे वाटू लागले. त्याला एक ते दीड वर्षाचा असताना जवळ-जवळ ५०० इंजेक्शन देण्यात आली. गालावर, कानाजवळ गाठी आल्या होत्या. त्यातून रक्त निघत होते. त्या हळू हळू बसू लागल्या व तो दैवयोगाने बरा झाला. त्या गाठीतून होणारा रक्त स्राव बंद झाला. सर्वांना हायसे वाटले. आईने त्यावेळी मोतमावली म्हणजे वांद्रयाच्या माऊलीला साकडे घातले की हा जर बरा झाला तर तो तुला देईन आणि लाडात वाढलेला आमचा भाऊ ''फादर स्टिफन'' एक दिवस आम्हाला न सांगता देवाच्या कार्याला त्याने आपल्याला वाहून घेतले. शिकवून एवढा मोठा करुन तो कमवायच्या वेळेस, हातभार लावायच्या वेळेस फादर होण्यासाठी संस्थेत दाखल झाला. ते सुध्दा येशू संघामध्ये खडतर जीवन जगून शेवटी त्याने आपले जीवन देवासाठी समर्पित केले. कारण ती देवाची इच्छा होती.त्याच्या कार्याला आम्हा नातलगांच्या खूपखूप प्रार्थनामय शुभेच्छा. फादर स्टिफन लहान असल्यामुळे आम्ही त्याला पोरा म्हणत ''पोरा जिथे जाशील तिथे सुखी रहा.'' कार्यात कमी पडू नकोस. आम्ही त्याला ''एवर रेडी बॅटरी म्हणतो '' कारण तो सदासर्वदा न थकता कोणत्याही कामासाठी हजर असतो. आम्ही त्याला आमचा ''बॉस'' मानतो. कारण आम्हांला त्याचा रास्त अभिमान व गर्व आहे. आमच्या कुटुंबात त्याचे स्थान खूप मोठे आहे. आम्हांला सतत त्याचा मोठा आधार वाटतो.

सेवेसाठी उभारलेले तुझे हे हस्त
त्यात अधिक उदारता येवो,
तू फुलविलास आनंद कुटुंबाचा
तू फुलविलास आनंद दीनदलितांचा
प्रभूच्या मळ्यातील तुझे हे पवित्रकार्यक्षेत्र
असेच फुलत, बहरत राहो सदा !

◆

## आज अमृताची पर्वणी आली, तरुणाई पंचाहत्तरीची झाली





**श्री. विन्सेंट गिरगोल फरगोज**

**जन्म : ८ एप्रिल १९५१**

**गोखिवरे, वसई ( पूर्व )**



*" प्रार्थनेतून शक्ती मिळाली, विश्वासाने वाट उजळली;*
*पंचाहत्तर वर्षांची ही कमाई, प्रभूच्या कृपेनेच फळली "*

*प्रिय अंकल,*

*आपले जीवन सदैव देवाच्या प्रेमाचे आणि विश्वासाचे सुंदर साक्षीदार राहो ह्याच ७५ व्या वाढदिवसाच्या हार्दिक प्रार्थनामय शुभेच्छा!*

**शुभेच्छुक : सौ. सुनिता फरगोज - मिरांडा**

# प्रेमळ स्मरणार्थ



**ख्रि. फ्रान्सिस इग्नेशियस ब्रिटो**
जन्म : २०-०५-१९३८
मृत्यू : १६-०४-१९८१

**ख्रि. पास्कीन फ्रान्सिस ब्रिटो**
जन्म : २०-०४-१९४०
मृत्यू : २४-१२-२०२५

*तुम्ही दिलेले प्रेम आणि संस्कार अमूल्य*
*तुमच्या मुळेच आयुष्य झालं सुंदर व मौल्यवान*
*तुमची आठवण डोळे ओले करते*
*तुमच्या स्मृतीना आमची विनम्र श्रद्धांजली.*

*✻ देणार ✻*
*कुटुंबिय*

प्रेमळ स्मरणार्थ



खि. बस्त्यांव झुज्या डाबरे
जन्म : ०३.०१.१९३३ ; मृत्यू : २८.०१.२०२३

खि. सांतान बस्त्यांव डाबरे
जन्म : ०१.०४.१९३९ ; मृत्यू : ०७.०३.२०२५



खि. बिशप डॉमणिक आब्रिओ
जन्म : ०३.०७.१९२३ ; मृत्यू : ०१.०५.१९८७



खि. लुईजाबाई झुज्या डाबरे
माणिकपूर
जन्म : १०.०५.१९०७ ; मृत्यू : ०६-०२-१९९१

खि. ऑगस्टीन डाबरीओ
खि. दुमा ऑगस्टीन डाबरीओ
खि. झुज्या दुमा डाबरीओ
खि. मायकल झुज्या डाबरीओ
खि. मर्यान झुज्या डाबरीओ
खि. मेरी व आलेक्स पिंटो
खि. इजाबेल विल्सन मिनेझीस

खि. लुजान ऑगस्टीन डाबरीओ
खि. रोजु दुमा डाबरीओ
खि. नाताळ झुज्या डाबरीओ
खि. आलेक्स झुज्या डाबरीओ
खि. अतीबाई व दुमा दालमेत
खि. जॉन जोसेफ कोलासो
खि. मार्गारिट मॅन्युअल मुन्तोडे

सर्व गावपरिवारास पास्का सणाच्या हार्दिक शुभेच्छा!

`डाबरे परिवार'

## ३ महिन्यांची आठवण





**ख्रि. पिटर लॉरेन्स डिकोष्टा**

जन्म : ०४-०९-१९३५; मृत्यू : २०-०१-२०२६

३ महिन्याची मिस्सा : २६-०४-२०२६ सकाळी ७.०० वा. सेंट मायकल चर्च, माणिकपूर

***As he often said, in the end, it's the good you leave behind, that matters***

*- P.M.C.*

**✻ देणार ✻**

**पत्नी : लुईजा पीटर डिकोष्टा**

**मुले : जेम्स पीटर डिकोष्टा, थॉमस पीटर डिकोष्टा**

**सुना : प्रेसिला जेम्स डिकोष्टा, रिम्पल थॉमस डिकोष्टा**



**नातवंडे : मारीया, क्लेरा, ट्विंकल, रिसा**



"SAY NOT IN GRIEF" 'HE IS NO MORE'
BUT IN THANKFULNESS THAT HE WAS



*Jerome Pascal Dsa*

**14.01.1940 - 25.02.2026**

**Monica Dsa**
**Shilpa - Sunil Dsa, Smita - Jacob Faroz**
**Christline - Sneden Gonsalves**
**Morrain - Bradley Lopes**
**Bianca Faroz, Jenice Dsa**

## वार्षिक स्मृती



*'' मी देहाने दूर आहे तरी आत्म्याने तुम्हांजवळ आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे.'' (कलस्सै २:४-५)*

हे प्रभू परमेश्वरा, आमच्या ज्युलीला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात सदैव आनंदी ठेव व तिला चिरंतन शांती दे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!

**ख्रि. ज्युली अंतोनी मिनेझीस**
मिनेझीस वाडी, माणिकपूर
जन्म : १८-१२-१९४९; मृत्यू : ०१-०६-२०२५
१ वर्षाची मिस्सा दि. ३१-०५-२०२६ रोजी सकाळी ७.०० वा.

पती : अंतोनी वेलेंटाईन मिनेझीस
मुलगा : अजय अंतोनी मिनेझीस;
जॉसलीन अंतोनी मिनेझीस
सुन : रोमीना अजय मिनेझीस
अमृता जॉसलीन मिनेझीस
नातवंडे : ऑस्टिन, अरनॉल्ड,
इरा, आयव्हन

## प्रेमळ स्मरणार्थ

ईस्टर सणाच्या हार्दिक शुभेच्छा!



**ख्रि. अंतोनी इग्नेशियस डिमेलो** **ख्रि. फिलोमीना अंतोनी डिमेलो**
माणिकपूर, फडबाव

जन्म : २९-१०-१९३१; मृत्यू : २४-१२-२०१०
जन्म : २८-०९-१९३५; मृत्यू : २२-०४-२०१९

*प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''*

प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

*मदर कॅथरीन मेरी इम्मॅक्युलेट होम फॉर द एजेड, बॅंगलोर*
*डिमेलो व कोलासो कुटुंबीय*

## एक महिन्याची आठवण



### ख्रिस्तवासी मेरी (डाली) सेबेस्टीन आल्मेडा

गॉड्स गिफ्ट, मेरी व्हिला, माणिकपूर

जन्म : १५/०३/१९३९; मृत्यू : ०१/०३/२०२६

*''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. जे अंतःकरणाने शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''*

(मत्तय ५:३,८)

पती : सेबेस्टीन; मुले-सुना : विल्यम-हेलन, मर्यान-स्मिता; मुली-जावई : लिना-मॅथ्यू, संगीता-परेश, नातवंडे : सिमोना, ज्युड, सॅम्युअल, ऑस्कर, स्टिव, सिमरन, संजना, शेल्डन; पतवंड : सेरीना

## पाच वर्षाची प्रेमळ आठवण



### ख्रि. स्टॅन्ली जोजेफ वाझ

जन्म : २८-०८-१९५७ मृत्यू : २८-०४-२०२१

*प्रिय स्टॅन्ली,*
*पाच वर्षे निघून गेली, अश्रूंचा पूर ओसरला नाही.*
*तुझी उणीव खूपच भासते, आठवणी अस्वस्थ करतात*
*तुझा हसरा चेहरा प्रेमळ स्वभाव दृष्टीआड होऊ शकत नाही.*
*प्रिय कुटंबीय, विशेषतः नातवंडे अजूनही दुःखातून बाहेर आली नाहीत*
*प्रभूच्या राज्यात सदा सुखी राहा हीच तुझ्यासाठी अमुची विनम्र याचना.*

✽ तुझे शोकाकुल कुटुंबीय ✽

**मार्था, कॅसल, सुनंद, नेथन व सॅम्युअल**

## प्रेमळ स्मरणार्थ



### ख्रि. फ्रान्सिस (फंच्या) अंतोन लोपीस

माणिकपूर पिठा, बी.के.एस. स्कूलमागे

जन्म : १८-१०-१९५१ ;मृत्यू : ०१-०६-२०२१

*प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''*

*(योहान ११:२५)*

प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**पत्नी : कॅथरीन फ्रान्सिस लोपीस**

## प्रेमळ स्मरणार्थ



### ख्रि. ज्यांव लोप

जन्म : २४-०७-१९१३

मृत्यू : २१-०३-१९८९

### ख्रि. आंजूबाई ज्यांव लोप

मृत्यू : १४-१०-१९७२



### ख्रि. मॉणिका पास्कोल लोपीस

जन्म : २८-०९-१९४९

मृत्यू : ३१-१०-२०२१

✽ देणार ✽

**कुटुंबीय**

माणिकपूर, नौपाडा

## सहा महिन्याची प्रेमळ आठवण



**सर्वांना ईस्टर सणाच्या हार्दिक शुभेच्छा!**

*'' मी देहाने दूर आहे तरी आत्म्याने तुम्हांजवळ आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे.'' (कलस्सै २:४-५)*

**ख्रि. अतीबाई मायकल कोलासो**
**माणिकपूर**

जन्म : १३-०५-१९३४, मृत्यू : ०५-१०-२०२५
६ महिन्याची मिस्सा दि. १२-०४-२०२६
रोजी सकाळी ७.०० वा. सेंट मायकल चर्च, माणिकपूर

*** देणार ***
**कुटुंबीय**

---

प्रेमळ स्मरणार्थ

**सर्वांना ईस्टर सणाच्या हार्दिक शुभेच्छा!**



स्व. मालती गवाणकर (आई)

**"तुझे वचन माझ्या पावलांसाठी दिवा आणि माझ्या मार्गासाठी प्रकाश आहे."**
**स्तोत्र ११९:१०५**




स्व. दिपक गवाणकर




स्व. किरण गवाणकर



स्व. उदय गवाणकर



स्व. अजय गवाणकर

**देणार : गवाणकर कुटुंबिय**

# वेदनेतून मिळालेली प्रेरणा

- क्लेरा पायस आल्मेडा

येशूने मानवतेसाठी अपार आणि असाह्य वेदना सहन केल्या. मात्र तो वेदनेतून साधनेकडे गेला. दु:खात तो रुतून न राहता त्याने पुनरुत्थानाची आशा दिली. जीवनाचा मार्ग हा मृत्यूच्या मैदानातून जातो, पण मृत्यू हा जीवनाचा शेवट नसतो. उपवासकाळ म्हणजे वसंत ऋतूचा काळ. ज्यावेळेला एखादं जुनं पान गळून पडतं त्यावेळेला तेथे हिरवं कोंब उगवतं. म्हणजेच आपल्या जीवनाचा मार्ग मृत्यूतून जीवनाकडे जात असतो. अंधारातून प्रकाशाकडे जात असतो.

आपली अडचण हीच आपल्याला जीवनात यशाची वाटचाल दाखवते, जीवनात अडीअडचणी किंवा दु:ख हे गरजेचे असते, कारण त्यावर आपण विजय मिळवला तरच आपल्याला जीवनात खरा आनंद मिळतो. जीवनातील अडीअडचणींवर मात करून यश मिळवण्यासाठी कठोर परिश्रम, आत्मविश्वास आणि सातत्य आवश्यक आहे. यश एका रात्रीत मिळत नाही, तर अपयश पचवून सतत प्रयत्न केल्याने मिळते. संकटांना घाबरून न जाता, ती एक संधी समजून त्याचा सामना केल्यास आयुष्यात मोठी सफलता नक्कीच मिळते. दुष्काळ आणि गरिबी यासारख्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून कठोर परिश्रमांच्या जोरावर यशस्वी होता येते. जीवनातील प्रत्येक अपयश आपल्यात नवीन ताकद आणि जिद्द निर्माण करते. संकटाना शिक्षा न मानता ती एक संधी आहे. संघर्षातच जीवनाला हिऱ्यासारखे पैलू पडतात. ज्यांच्याकडे मेहनत करण्याची तयारी असते. त्यांच्यासाठी अशक्य काहीच नसते.

जीवनात आनंद व यश मिळविण्यासाठी स्वत:वर विश्वास ठेवणे, परिस्थितीला दोष न देणे, कामाप्रती समर्पण ठेवणे. आणि सतत शिकत राहणे गरजेचे आहे. संकटे आपल्यातील शक्ती पाहण्यासाठी येत असतात. आपल्याला संपविण्यासाठी नाही.

ज्याप्रमाणे ख्रिस्ताने मरणावर विजय मिळविला तसा मी माझ्या जीवनात माझ्या आईच्या बाबतीत मरणातून पुनरुत्थानाचा अनुभव घेतला.


माझ्या आईचं माझ्या जीवनात अमोल स्थान होते. माझी तिच्याशी शेवटपर्यंत नाळ जुळली होती. प्रभूवर नित्य श्रद्धा, खूप परिश्रम, जीवनात प्रामाणिकता धीराने हालअपेष्टा सहन करण्याची वृत्ती आणि लेकरांना सुसंस्कृतपणे घडवणे हे तिने आपल्या जीवनाचे ध्येय ठेवले. तिने आम्हा सर्वांवर अतोनात प्रेम केले. जेव्हा तिच्या मरणाची वेळ आली, तिचं मरण पेलणं हे माझ्यासाठी खूप यातनेचं होतं. जणू आपली आई आपल्याकडे नेहमी असावी असं सर्वांना वाटतं, तस मलाही वाटत होतं. तिने ज्याप्रकारे आजारपण सहन केले. प्रभूची साथ संगत धरली, ती माझ्यासाठी एक प्रेरणा ठरली. मृत्यूशी झुंजतही ती पुनरुत्थानाची सोनेरी किरणे अनुभवत होती आणि त्या सोनेरी किरणात आम्ही सहभागी होतो. माझी आई मरण पावली. पण, ती मरण पावली नाही, ती आहे. तिचं प्रेम हे मरणापलीकडे होते. ते आम्हाला स्फूर्ती देते. जणूकाही सतत आमची काळजी घेते. आणि जरी आई मरण पावली असली तरी ती आमच्या सतत सोबत आहे. कारण ती ख्रिस्ताबरोबर जिवंत झालेली आहे. हा अनुभव मला मरणातून जीवनाकडे नेतो.

◆

# वेदनेतून विजयाकडे

लिडिया जॉन्सन लोपीस

*'Enduring Sorrow to resurrection' या संकल्पनेचा अर्थ 'दुःखातून सुटका आणि नवीन आयुष्याची सुरुवात' असा होतो. हे प्रामुख्याने येशू ख्रिस्ताच्या क्रुसावरील मृत्यू (Good Friday) आणि त्यानंतरच्या पुनरुत्थानाशी (Easter) संबंधित आहे, हे ख्रिस्ती धर्मात विज्ञानात आशा आणि नवीन जीवनाचे प्रतीक आहे. कठीण काळातून, दुःखातून आणि संकटातून बाहेर पडून एका नवीन, आशावादी आयुष्याची सुरुवात करणे. हे अंधारातून प्रकाशाकडे जाणे आहे.



* संदर्भ :''दुःखाचे रुपांतर आनंदात'' (Your sorrow will be turned into joy ) येशू ख्रिस्ताने स्वतःचे बलिदान देऊन मानवाला पापांतून मुक्त केले आणि पुनरुत्थानाव्दारे मृत्यूवर विजय मिळवला. हा विश्वास आहे की, प्रत्येक गुड फ्रायडे नंतर 'ईस्टर संडे' येतो, म्हणजेच संकटानंतर सुवर्णकाळ येतो. थोडक्यात सांगायचे तर, 'Enduring sorrow to resurrection' म्हणजे संकटांना सामोरे जाऊन, ख्रिस्ताच्या कृपेने एका नवीन आणि आनंदी आयुष्याकडे वाटचाल करणे.

* 'Enduring sorrow to resurrection' (दुःखातून पुनरुस्थान /नवनिर्मिती ) ही संकल्पना मानवी जीवन, अध्यात्म आणि साहित्य यांमध्ये अत्यंत महत्वाची आहे. याचा अर्थ अत्यंत कठीण दुःख, नैराश्य किंवा अपयशाला सहन करुन त्यातून तावून सुलाखून बाहेर पडणे आणि एक नवीन, अधिक बळकट जीवन सुरु करणे असा होतो.

Resurrection / हे कठीण दुःखातून किंवा मृत्यूनंतरच्या पुनरुत्थानाचे एक उदाहरण आहे. शेकडो वर्षांची गुलामगिरी आणि दुःखाचा काळ (Sorrow) सहन केल्यानंतर अनेक क्रांतिकारकांच्या बलिदानामुळे देशाचा पुर्नजन्म झाला आणि भारत स्वतंत्र झाला. दुःख अंत नाही, तर ती एक नवनिर्मितीची प्रक्रिया आहे. ज्याप्रमाणे बीज मातीत गेल्याशिवाय नवीन कोंब फुटत नाही, तसेच माणसाच्या आयुष्यात दुःखातून ताकदीचा पुर्नजन्म होतो.

तिसऱ्या दिवशी, येशू ख्रिस्त मरणातून जिवंत होऊन उठले. यालाच पुनरुत्थान (Resurrection ) म्हणतात. जे मृत्यूवर जीवनाचा विजय आहे. येशूचे जीवन हे दाखवते की दुःख शेवट नाही, तर त्यातूनच खरा विजय (पुनरुत्थान) जन्म घेतो. यालाच दुःखावर मात करुन मिळवलेला विजय असे म्हटले जाते.

◆

# ''पुनरुत्थानाची मंगल पहाट''

**क्रिस्टी सिरेजो**

आठवड्याच्या पहिल्या दिवशी भल्या पहाटे मरिया मॅग्दालेना व इतर स्त्रिया येशूच्या मृत शरीरास सुगंधी तेल लावण्यास आतूरतेने कबरेजवळ आल्या असता त्यांना कबरेवरुन धोंड लोटलेली दिसली. तेव्हा लखलखीत वस्त्रे परिधान केलेले दोन पूरुष त्यांना म्हणाले तुम्ही जिवंताचा शोध मेलेल्यात का करिता ? तो उठला आहे. व तुमच्या आधी गालीलात पोहचला आहे. तेव्हा त्यांना येशूच्या पुनरुत्थानाविषयी बोलण्याची आठवण झाली व त्या आनंदाने व चैतन्याने भरुन गेल्या.

प्रभातीच्या समयी क्षितिजावरती लाळी पसरवलेली होती. पक्ष्यांचा मंजुळ किलबिलाट, कोकिळेचे मधुर सूर घुमत होते. सकाळचा गारवा मनाला सुखावत होता. त्यातच माग्दालेनाने आणलेला सुगंधी तेलाचा सुवास सर्वत्र पसरला होता. अंडकोश्यातून सुंदर सप्तरंगी फुलपाखरु बाहेर पडून निरनिराळया फुलांवर मधू वेचित फिरत होते. व ख्रिस्त मृत्यूच्या भयाण कवचातून मृत्यूंजय होऊन उठला होता. तो मृतातून जन्मलेला प्रथमफळ असा होता. देवाने त्याला अद्‌भूत व गौरवशक्ती शरीर दिले होते.

येशू योहानकृत शुभवर्तमानात म्हणतो, ''मी जगाचा प्रकाश आहे. जो मला अनुसरतो तो अंधारात चालणार नाही. त्याच्याजवळ जीवनाचा प्रकाश राहील.'' जगात प्रकाश आला पण माणसांनी प्रकाशाऐवजी अंधाराची आकस धरली कारण त्यांची कृत्ये अनैतिक होती. ते पापाच्या अधिन होते.

बंधुनो ऋतूमानाप्रमाणे दरवर्षी येतो पावसाळा हिवाळा व उन्हाळा व त्या बरोबर उपवासकाळ. भावूक होऊन कपाळाला राख लावून चाळीस दिवस आपण उपवास व प्रार्थना यांस वाहून घेतो. ज्या वेदना प्रभूने आपल्या पापासाठी सोसल्या त्याची आठवण करुन त्यांना उजाळा देतो.

प्रार्थना व उपवास ही देवाजवळ जाण्यास आपल्याला मदत करतात.

पण ईस्टर येताच जुन्या व अयोग्य सवयी आपण जोमाने पुढे चालवितो. यशया संदेष्टाने सांगितल्याप्रमाणे देवाला ग्रहणीय उपवास म्हणजे भीतीने वागणे, आवडीने दया करणे, अनाथाचा व निराधार विधवांचा कैवार घेणे. (अशुद्धतेचा मळ साठून वाईट बोलण्याचे व दृष्टपणा व लबाडी सोडून देणे हा होय.) देवाला आपला अंर्तबाह्य कायमस्वरुपी बदल हवा आहे.

येशू आपणांस आश्वासन देतो, तुमचे अंतःकरण अस्वस्थ व भयभीत होऊ देऊ नका. देवावर श्रध्दा ठेवा आणि माझ्यावरही श्रध्दा ठेवा. माझ्या पित्याच्या घरात राहण्यासाठी पुष्कळ जागा आहेत. मी तुमच्यासाठी जागा तयार करण्यासाठी जात आहे. मी जागा केल्यावर परत येईल आणि जिथे मी आहे तिथे तुम्हीही असावे.

पृथ्वी ही देवपुत्राच्या प्रगट होण्याची उत्कटतेने वाट पाहात आहे. ती वेळोवेळी वेदनेने कण्हत आहे. कधी कोवीड सारखी महामारी तर कधी निरपराध माणसांचे व बालकांचे बळी घेणारी, देशादेशातील वाद व युध्दे. पृथ्वीचे वाढते तापमान व त्याचे परिणाम, तर कधी अहंकाराने केलेली अणुपरीक्षणे हे सर्व तिलाच सोसावे लागते.

संत पौलाने कलैसिकरांस पत्रात सांगितल्याप्रमाणे तुम्ही देवाचे पवित्र व प्रिय असे निवडलेले लोक आहात म्हणून करुणायुक्त हृदय, ममता, सौम्यता, लिनता, सहनशीलता ही धारण करा. एकमेकांचे सहन करा आणि कोणाविरुध्द कोणाचे गाऱ्हाणे असल्यास आपसात क्षमा करा.

पुनरुत्थित प्रभू येशूची शांती व आनंद आपल्या सर्वाबरोबर असावी हीच प्रार्थना !

◆

# दुःखसहन : एक कौटुंबिक प्रवास (चिंतन)

मेरी मॅकमी डिमेलो

**'दुख हो या सुख**
**जब सदा संग रहे न कोई**
**फिर दुख'**
राही मनूवा दुख की चिंता क्यों सताती हैं
दुख तो अपना साथी हैं
सुख है छाँव ढलती
आती हैं जाती है |
**दुख तो अपना साथी है !**

हे गाणं दोस्ती चित्रपटातील असून मोहम्मद रफी यांनी त्यांच्या सुरेल आवाजात गायलेले आहे.

प्रिय भाविकांनो आज आपण एका अत्यंत अर्थपूर्ण आणि अंतर्मुख करणाऱ्या विषयावर चिंतन करणार आहोत.

प्रत्येक सजीवाला दुःख, संघर्ष व त्याग असतो, पण दुःख का येते ? दुःखाचा काळ म्हणजे मानवाच्या धैर्याचा, संयमचा, शांततेचा व प्रयत्नांचा काळ असतो. दुःखामुळे सुखाची किंमत कळते, किंबहुना ती द्विगुणीत होते. जेव्हा दुःख संकटे येतात तेव्हा आपण संघर्ष करतो धीराने संयमाने त्या दुःखाला सामोरे जातो व शेवटी विजयाच्या आनंदाने सुखावतो. दुःखात आपण परमेश्वराच्या अधिक जवळ जातो. जेव्हा कोणी नाही तेव्हा तो विधाता, विश्वाचा निर्माताच आपल्या सोबत असतो. आपण मुक्तपणे आपली व्यथा, वेदना त्याच्यापुढे मांडतो, तो क्षण अत्यंत महत्वाचा आहे. त्यावेळी आपण पूर्ण विश्वासाने संकटातून मार्ग शोधण्यासाठी देवपित्याची मदत घेतो.

जगी असा एकही मानव नाही, की त्याला दुःख नाही. दुःख अनेक प्रकारची असू शकतात परंतु त्यातून आपण संयमाने कसे विजयी होतो हे फार महत्वाचे आहे. जेव्हा परमेश्वर एक दरवाजा बंद करतो तेव्हा तो अनेक दरवाजे उघडतो आपल्या प्रगतीसाठी, आपल्या तारणासाठी, जो यावर विश्वास ठेवतो तो नेहमीच विजयी होतो. एक छोटा अनुभव मी तुम्हासमोर मांडणार आहे. जेथे तुम्हाला समजेल की परमेश्वर कधीही आपल्याला एकटे सोडत नाही तसेच त्याची योजना वेगळी असते. आपली प्रगती व्हावी आपण परमेश्वराचा गौरव अनुभवावा म्हणून परमेश्वर आपणास संधी देतो.

एक २० वर्षांची तरुणी D.Ed. करुन एका शाळेत कामाला लागली. वर्षभर उत्तम प्रकारे प्रामाणिकपणे कार्य केले. परंतु वर्षाअखेर तिला कमी करण्यात आले. जेथे तिच्या सोबत लागलेल्या एका मैत्रिणीला तेथेच ठेवले. ती घरी आली खूप हताश झाली, रडू लागली. परंतु तिची आई म्हणाली. 'काळजी करु नकोस परमेश्वर जेथे एक दरवाजा बंद करतो तेथे नशिबाचे अनेक दरवाजे उघडतो' त्यानंतर बऱ्याच दिवसांनी एका शाळेत अर्ज देण्यास गेली. तेथे क्लर्क म्हणाले Vacancy नाही. तुम्हाला कोणी पाठवले ? आम्ही सांगितले परमेश्वराने सुचवले. आम्ही त्याच आवारात S.S.C. बोर्डाची दुसरी शाळा आहे, तेथे अर्ज देण्यास गेलो. तेथे प्रिन्सीपल मिटिंगमध्ये होते. आम्ही वाट पाहत बसलो इतक्यात Call आला. तुम्ही कुठे आहात ? लवकर या प्रिन्सिपल आले आहेत. ते तुम्हाला बोलवतात. आम्ही लगेच गेलो असता प्रिन्सीपल म्हणाले आत्ताच एका बाईने राजीनामा दिलेला आहे. त्या मुलीला तिथे नोकरी लागली. आज १५ वर्ष त्याच शाळेत कार्यरत आहे व खूप आनंदित आहे. घरापासून अगदी जवळ व मोठया शाळेत नोकरी लागली.

असे अनेक प्रसंग मी अनुभवले आहेत तरी सतत प्रार्थनेत रहा. परमेश्वरावर विश्वास ठेवा. तुमचे नक्कीच तारण होईल.

◆

# A N G E R

**Gregory Monis**

ANGER is absolutely necessary for maturity and healthy human relationships. It's basically good emotion, and not necessarily sinful. ANGER is often the underlying cause of emotional, mental, physical and relational problems, because it's not properly understood and used. It's an unresolved issue in every marriage.

It's important that we develop a positive attitude towards anger. If we accept our anger along with all our other emotions, we shall see our anger as another aspect of humanness.

What I am angry about? With whom am I angry? We should be able to distinguish "logical" anger and "illogical" anger.



In the bible, God is often described as angry. If we read the Psalms, which are examples of therapeutic prayer, that is of really letting out one's feelings, the psalmist prays from his heart, not from his head and find plenty of anger. Psalm 38: "O Lord, in your anger punish me not".

Once Jesus was quite disguised and angry and did not mince any words with Peter, “Get behind me, Satan!" but he was human and a part of being human is coming to grips with our anger. It's important to realise that so far as we repress our anger, we are behaving dishonestly.

When we overreact, our anger is out of control. It is expressed in temper, rage, fury, which can lead to violence.

We fear anger. And because we fear it, we suppress it. We fear overreacting because then our anger will control us. Our behaviour is what is wrong, not our feelings.

If hidden anger is not brought out on the surface and dealt with, it will reappear in some other form. It often appears as a psychological, physical or psychotic problem. People often talk about their physical ailments - colitis, chest pains. hair loss, headache, ulcers, etc.

Neglected anger affects us spiritually too.

Some people are very controlled, never show anger, and held up as models. They never become angry. In such people we usually find a built up anger and other unresolved feelings burried within the person that burst forth in bizarre behaviour.Many criminals and people with character disorder are really angry people. They are angry about the things that happened to them perhaps especially in their childhood.If we don't deal with the anger that we feel, our relationship leads to resentment, bitterness, and hostility.Anger is

absolutely necessary for mature human relationships.If we don't express our angry feelings, openly to a friend, then we will openly talk behind the person's back or be cold to that person.More marriages and families today are dying from silence. In nine out of ten marriages or families this is the situation. Everyone among the members of the family begin to yell and scream at each other.

Sometimes we have to give the other person and ourselves time to cool off. We can forgive someone when we are hurt and angry, but we have to remember to forgive ourselves and give ourselves. time to forget, to heal, to cool off, because feelings can persist for a long time.The purpose in expressing anger is not to change the other person. It's to let him or her know where we are. and how we feel about him or her. What the other person does with that anger is his or her choice.We should expect that people are going to be hurt when we show appropriate anger.Appropriate anger - we must allow ourselves to feel it, deal with it, and be able to reveal it. This is what means to take responsibility for our lives. And this is what emotional maturity is all about. And this is why anger is virtue ! Anger is truly an important part of our lives. It helps us to be honest, to be genuine, to live a healthy and vibrant life, to trust, to love and to be intimate.

◆

# SEARCH !

A search for peace is going on.
A search for freedom was never won
A search for love was left far behind
Coz it was believed that it could never bind.
A search for hope has gone long enough. A search for understanding?
Oh! It's very tough.
A search for trust is long lost.
We have no clue what it might cost.
A search for bravery is still to be found.
A search for sacrifice has no bound.
A search for sanity is in the bin.
When shall we know what's a sin?
A search for forgiveness is in process.
Each passing day it is becoming useless.
A search for courage is on the run.
But it weighs even more than a ton.
A search for humanity never ends.
For the hope that it lends.
A search for justice has lost all its hope
Because the pain cannot be coped.
A search for standards was always rushed.
With it dreams were forever crushed.
A search for friendship is on the way.
Emptiness is endless and hearts are cold as clay.

**- Sylvia Colaco**

# Walk with God !

**By Dr Marisca Austin Pereira**

After a long day at work, I was fully convinced I had earned my right for some mindless scrolling. I came across a clip of one of my favourite actors "Matthew McConaughey". He was chatting casually with a few anchors and mentioned something almost cliche, “that he never prayed for awards or Oscars.” Instead, “he prayed to become a man who could do his work well and put food on the table for his family.”



That landed quietly, but firmly.

Because if we're honest, many of our prayers sound a little like carefully worded requests or sometimes even negotiations. Let this work out. Let me succeed. Let me just get through this. And when we're unsure, we add the spiritual equivalent of fine print: "Your will be done."

But what if surrendering to God isn't about standing still on the tracks, hoping the problem politely moves out of the way? What if it's more about learning how to walk the path with God, preferably without tripping over the same stone every time?

The human mind loves outcomes. We also yearn for yes or no. So naturally, our prayers follow the same structure. Yet surrender doesn't seem to mean switching off or stepping back. If anything, it looks more like participation, which is learning, adjusting and showing up a little wiser than last time.

I always like to wind down my day with walking through the park without my phone, having a conversation with Jesus in prayers and asking what he would like me to do. Have you ever tried that? Just walking and asking Jesus to equip you with tools necessary to reach your outcomes?

Perhaps in walking with Jesus at the end of the day, we realise we're also walking in His way!

◆

**पाच वर्षांची प्रेमळ आठवण**



**ख्रि. फ्रान्सिस पास्कोल घोन्सालवीस**

**जन्म : ०३-०२-१९४७ मृत्यू : १७-०३-२०२१**

*प्रिय डॅडी,*

*पाच वर्षांचा काळ लोटला परंतु तुमची उणीव घरात खूपच भासते. तुमचा प्रेमळ गोड स्वभाव आणि तुम्ही आम्हां सर्वांवर केलेले प्रेम आमची काळजी विसरताच येत नाही.*

*भगवंताकडे दिनरात एकच प्रार्थना*
*सुखी ठेव आमच्या डॅडीना तुझ्या राज्यात*

**✻ कुटुंबीय ✻**

# Sports to Spirituality

## *A Testament to Good Leadership*

**Pascol Roque Lopes**

The Pilgrim Walk this Lent season was one of a Kind in Vasai. It was truly remarkable, drawing an overwhelming response. Its success lay not just in participation but in excellent organization—refreshments, volunteers, permissions, traffic management, and medical support were all thoughtfully arranged. Yet the humble acceptance that "This is just the first time, we have scope for improvements in the future." Right now, we the parishioners of Manickpur, are enjoying an astounding experience of all the Priests in our Church, striving to find innovative ways to bring people together, from marathons to pilgrimages, sports to spirituality. Greetings and Visitations, Support and Prayers...all leading to make us feel as one big family.Under the Captaincy of Fr. Assis Rodrigues...Manickpur's 'St. Michael's Parish' looks like ONE TEAM. It's commendable to see a priest....leading...going beyond church duties and bringing forth enthusiasm. This 'First Citizen Of Manickpur' brings to the table, not just a keen eye on diversity ...but empowerment of new faces and changing hands on various parish initiatives and committees.Lifting the prohibition on youth playing in the church premises – "Kach tutli tar mi navin basvel tumhi khela" what a great starting point to get the youth in the church campus – it's an inclusive approach, so many women are today seen playing inside the church premises. He has made Manickpur Village playful, youthful, and energetic. The leadership Fr. Assis is providing is giving our youths and everyone volunteering; Management lessons of "What They Don't Teach You at Harvard Business School" – read the book if you haven't yet!

◆


प्रेमळ स्मरणार्थ





**ख्रि. फ्रान्सिस सेलेस्तीन मोरायस**

**जन्म : २९-०३-१९४५**
**मृत्यू : ३०-०५-२०१३**

**✻ देणार ✻**
**लोपीस, मोरायस आणि डाबरे कुटुंबीय**



***Hands joined in joy, Hearts united in strength -***
***A beautiful Women's Day celebration***




**Manickpur Marathon 2026**

*In loving memory of*



## *Late Rosy Philip Almeida*

***D.O.B. : 30-05-1931, D.O.D. : 03-10-2025***

*If tears could build a stairway and memories a lane,*
*I'd walk right up to Heaven and bring you home again.*
*Miss u Aaya*

## *Remembered by*

SAMAIRA
GROUP
YOUR DREAM. OUR BLUEPRINT.

Manual Print : 9765874493